cmyk

## संपादकीय

### मुले जबाबदार होण्यासाठी पालकत्व समजावे लागते

समाज माध्यमांचा सामाजिक आणि लोकांच्या वैयक्तिक आयुष्यावर प्रभाव वाढत असताना पालकत्व अधिकाधिक आव्हानात्मक होत आहे. मूल्यसंस्कार, जबाबदाऱ्या, विचार यांची रुजवण कशी करायची, असे कळीचे प्रश्न पालकांना पडतात. मुलांवर त्यांच्या वयाच्या तिसऱ्या वर्षापासूनच जबाबदाऱ्या सोपवायला सुरुवात करावी. योग्य पर्याय निवडण्याचे भान त्यातून वाढते.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com  नवी दिशा... नवे विचार.....  email:rajyaloktantra75@gmail.com


### वंचित बहुजन आघाडीची दुसरी यादी जाहीर

मुंबईः वंचित बहुजन आघाडीने रविवारी (दि. ३१) लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. एक्स पोस्ट करत ही माहिती दिली आहे. एकूण ११ उमेदवारांची ही यादी आहे. वंचितच्या पहिल्या यादीत एकूण ९ जागांचा समावेश होता. या जाहीर केलेल्या यादीनंतर एकूण २० उमेदवार झाले आहेत. वंचित बहुजन आघाडीकडून माढा मतदारसंघातून रमेश बारस्कर, सातारा लोकसभा मतदारसंघासाठी मारुती जानकर, तर धुळे मतदारसंघातून अब्दुल रहमान, हातकणंगले मतदारसंघातून दादासाहेब पाटील, रावेरमधून संजय पंडीत ब्राह्मणे, जालन्यातून प्रभाकर बाकळे, उत्तर मध्य मुंबईमधून अब्दुल खान आणि रत्नागिरी-सिंधुदुर्गातून काका जोशी, लातूर मधून नरसिंहराव उदगीरकर आणि सोलापुरात राहुल गायकवाड यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.


बीड - महाराष्ट्र | वर्ष - ०३ | अंक-३४९ | सोमवार दि.०१ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये


# दुष्काळ राज्याच्या वेशीवर

## मोठ्या धरणांमध्ये ३७.९१ पाणीसाठा, जनावरांच्या चाऱ्या पाण्याचा प्रश्न गंभीर

पुणे । प्रतिनिधी

गेल्या वर्षी राज्यात सरासरी पेक्षा पाऊस कमी झाला. यामुळे यंदा राज्यातील अनेक जिल्ह्यांध्ये पाणीटंचाईचे चित्र आहे. अनेक जिल्ह्यांध्ये सध्या पिण्यासह शेतीच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतीला पाणी नसल्याने उभे पीक करपले असून जनावरांच्या चाऱ्या पाण्याचा प्रश्न देखील गंभीर बनत आहे. यामुळे शेतकरी हवालदील झाला असून सर्वसामान्यांना



पाण्याचा प्रश्न सतावत आहे. दरम्यान मार्च महिन्याच्या शेवटच्या दिवशी रविवारी राज्यातील सर्व धरणातील पाणीसाठ्यात मागील तीन दिवसात १.८५ टक्क्यांनी घट झाली आहे. तर सद्यस्थितीत राज्यातील सर्व धरणांमध्ये ३७.९१ टक्के पाणी शिल्लक आहे. हाच साठा गेल्यावर्षी याच दिवशी ४६.८३ टक्के होता. तर तीन दिवसांपुर्वी ३९. ७६ टक्के होता.

सर्व लहान मोठी अशी धरणे मिळून राज्यात सुमारे २,९९४ धरणे आहेत. यात मोठे प्रकल्प-१३८, मध्यम प्रकल्प- २६० आणि लघू प्रकल्प- २५९६ आहेत. या सर्व धरणांमध्ये मार्च महिन्याच्या शेवटच्या दिवशी ३७.९१ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे. पान २ वर

### मराठवाड्यात पाणीटंचाईच्या झळा

गेल्या वर्षी पाऊस सरासरीपेक्षा कमी झाल्याने धरणातील पाण्याच्या साठ्यात म्हणावी तसी वाढ झालेली नाही. उलट तापमानात वाढ झाल्याने धरणातील पाणीसाठ्याने तळ गाठला आहे. यामुळे राज्यातील अनेक गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. राज्यात ३ हजार गावांना ९४० टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर एकट्या बीड जिल्ह्याने १५० टँकरची मागणी केली आहे. तर मराठवाड्यात पाणीटंचाईच्या झळा तीव्र होत असून येथे आठपैकी पाच जिल्ह्यांमधील ६४७ गावांना ७६३ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.

## महाराष्ट्र सदन घोटाळ्याप्रकरणी आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

### छगन भुजबळांच्या अडचणी वाढणार?

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणी निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. छगन भुजबळांच्या निर्दोष मुक्ततेनंतर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. आता सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी हस्तक्षेप करत या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले असून, आज सोमवारी सुनावणी होणार आहे. यामुळे नाशिक लोकसभेची तयारी करणाऱ्या छगन भुजबळांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

याबाबत अंजली दमानिया यांनी ट्विटरवर पोस्ट शेअर केली आहे. त्यात म्हटले आहे की, महाराष्ट्र सदन घोटाळ्यात छगन भुजबळांना निर्दोष सोडण्यात आले होते. या प्रकरणातील डिस्चार्जला आव्हान देणारे अपील गेली दीड वर्ष ऐकले जात नव्हते. पाच न्यायाधीशांनी 'नॉट बिफोर मी' असे म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयासमोर एक एसएलपी करून त्यावर ओरडी घेऊन, माननीय सीजे यांना योग्य न्यायाधीशांसमोर त्याची लिस्टिंग करण्यासाठी विनंती करण्याचे आदेश मिळाले आहेत. शेवटी प्रकरण अनुक्रमांक १२ वर न्यायमूर्ती मोडक यांच्यासमोर ठेवण्यात आले आहे.


दरम्यान, महाराष्ट्र सदन कथित घोटाळा प्रकरणी छगन भुजबळांची याआधी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या न्यायालयाकडे दोषमुक्त करण्यासाठी छगन भुजबळांनी अर्ज दाखल केला होता. त्यांच्यासोबत त्यांचे पुतणे समीर भुजबळ यांनी देखील दोषमुक्त करण्यासाठी अर्ज दाखल केला होता. त्यानंतर न्यायालयाने भुजबळांची निर्दोष मुक्तता केली होती. भुजबळांच्या निर्दोष मुक्ततेनंतर अंजली दमानिया यांनी मुंबई उच्च न्यायालयात याबाबत याचिका केली पान २ वर

# शरद पवारांची ज्योती मेटे यांना तर जयंत पाटलांची बजरंग सोनवणे यांना पसंती

## मुंबईत पवार-मेटे यांची भेट; उमेदवारी कोणाला मिळणार याकडे सर्वांचे लक्ष

बीड । प्रतिनिधी

**भाजपकडून पंकजा मुंडे यांना बीड लोकसभेची उमेदवारी जाहीर केल्यानंतर कालावधी उलटला तरी महाविकास आघाडीचा उमेदवार जाहीर करण्यात आला नाही. शरद पवार यांची ज्योती मेटे तर जयंत पाटील यांची बजरंग सोनवणे यांना पसंती आहे. त्यामुळे बीडच्या उमेदवारीचा तिढा अजूनही महाविकास आघाडीला सोडवता आलेला नाही. पंकजा मुंडे यांच्या विरोधात उमेदवार नेमका कोण असेल याबाबत बीड जिल्ह्यातील नागरिकांना उत्सुकता आहे.**



बीड लोकसभेकडे सध्या संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. भाजपचे नेते पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिल्यामुळे या मतदारसंघात नेमका निकाल काय लागतो याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. पंकजा मुंडे यांनी गेल्या आठ दिवसापासून प्रचारामध्ये आघाडी घेतली आहे. महायुती मधील वरिष्ठ नेत्यांच्या त्यांनी भेटीगाठी सुरू केल्या असून जनसंपर्क जास्तीत जास्त वाढवण्याचा त्यांचा सध्या प्रयत्न आहे.

एकीकडे पंकजा मुंडे प्रचारामध्ये मग्न असताना दुसरीकडे महाविकास आघाडीचा अद्यापही उमेदवार ठरला नाही. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाकडून ज्योती मेटे आणि बजरंग सोनवणे या दोघांपैकी एकाला उमेदवारी दिली जाईल असे म्हटले जात असले तरी शरद पवार आणि जयंत पाटील यांच्यामध्येच बीड मधील उमेदवार कोण असावा याबाबत मत भिन्नता आहे. बीड लोकसभेसाठी ज्योती मेटे या कधीही फायदेशीर उमेदवार राहू शकतात, त्यामुळे त्यांनाच उमेदवारी दिली पाहिजे अशी भूमिका शरद पवार यांची आहे. तर दुसऱ्या बाजूला बजरंग सोनवणे हे यापूर्वी लोकसभा निवडणूक लढवलेले पान २ वर

### सोनवणे पेक्षा ज्योती मेटे सरस

पंकजा मुंडे यांच्या भगिनी खा. प्रीतम मुंडे यांनी बजरंग सोनवणे यांचा २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये एक लाख ६८ हजार मतांनी पराभव केला होता. तसेच त्यांची कार्यपद्धती काय आहे हे भाजपच्या यंत्रणेला माहित आहे. परिणामी सोनवणे महाविकास आघाडीचे उमेदवार राहिले तर आपला सहज विजय होईल असा विश्वास महायुतीच्या नेत्यांना आहे. दुसरीकडे ज्योती मेटे या राजकारणात नवीन आहेत. कोरी पाटी म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जाईल. विरोधकांना मेटे यांच्या विषयी बोलताना कोणताही मुद्दा नसेल, विनायक मेटे यांच्या बाबतीतील सहानुभूती त्यांना मिळेल, मराठा समाजाची खंबीर साथ त्यांना मिळेल अशा बऱ्याचशा मुद्द्यावरून ज्योती मेटे या बजरंग सोनवणे यांच्या पेक्षा बीड लोकसभेच्या उमेदवारीसाठी सरस ठरतात. मिळते उमेदवार असतील तर पंकजा मुंडे यांच्यासाठी धोक्याची घंटा असू शकते.

## भाजपची नववी यादी जाहीर

नवी दिल्ली। वृत्तसंस्था

भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची नववी यादी जाहीर केली आहे. यामध्ये दामोदर अग्रवाल यांना राजस्थानच्या भिलवाडा लोकसभा मतदारसंघातून तिकिट देण्यात आले आहे. यापूर्वी भाजपने काल आपल्या उमेदवारांची आठवी यादी जाहीर केली होती. यामध्ये पंजाबमधील गुरुदासपूर लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार आणि बॉलिवूड पान २ वर

## केजरीवालांना अटक हा लोकशाहीवरील हल्ला

### शरद पवारांचा केंद्रावर हल्लाबोल

नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**अरविंद केजरीवाल यांच्या अटकेच्या निषेधार्थ दिल्लीतील रामलीला मैदानावर इंडिया आघाडीच्या वतीने रविवारी (दि. ३१ मार्च) महासभा आयोजित करण्यात आली होती. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवारचे अध्यक्ष शरद पवार यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर हल्लाबोल केला.**

शरद पवार म्हणाले की, ''केंद्र सरकारने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अटक केली आहे. विविध राज्यांतील अनेक नेत्यांना तुरुंगात टाकले आहे. ही कृती लोकशाहीवरील हल्ला आहे. आता संविधान वाचवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे.'' केजरीवालांना जास्त काळ तुरुंगात ठेवू शकणार नाहीत. यावेळी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल म्हणाल्या, ''तुमच्याच केजरीवाल यांनी तुरुंगातून तुमच्यासाठी संदेश पाठवला आहे. हा मेसेज वाचण्यापूर्वी मला तुम्हाला काही विचारायचे आहे. आमचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माझ्या पतीला तुरुंगात टाकले, पान २ वर



### मॅचफिक्सिंगसारखी भाजपने लोकसभा निवडणूक फिक्स केली - राहुल गांधी



लोकसभा निवडणुकीसाठी पंच पंतप्रधान मोदी यांनी निवडले आहेत. मॅच सुरू होण्यापूर्वीच दोन खेळाडूंना अटक केली आहे. सरकारचा मॅचफिक्सिंगसारखे निवडणूक फिक्स करण्याचा प्रयत्न सुरू आहे. परंतु, मॅचफिक्सिंग जिंकली, तर संविधान हरेल, त्यामुळे तुम्ही मॅचफिक्सिंगला बळी पडू नका, असे आवाहन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केले. तपास संस्थांचा वापर विरोधकांविरोधात केला जात आहे. जर लोक निवडणुकीत ईव्हीएम नसेल, तर भाजपला १८० जागाही मिळणार नाहीत, असा दावाही गांधी यांनी यावेळी केला. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, झारखंडचे माजी पान २ वर

## अवकाळी पाऊस पाठ सोडेना; एप्रिलमध्येही राज्यात पावसाची शक्यता!

पुणे । प्रतिनिधी

**अवकाळी पाऊस महाराष्ट्रासह देशाची पाठ सोडायला तयार नाही. गेले चार ते पाच दिवस राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाच्या सरी बरसल्यानंतर सध्या राज्यातील ढगाळ वातावरण काहीसे निवळले आहे. अशातच आता काहीशी विश्रांती घेत पुन्हा एकदा ७ एप्रिलनंतर राज्यात दोन ते तीन दिवस ढगाळ वातावरणासह पावसाचे वातावरण सक्रिय होण्याची शक्यता आहे. प्रामुख्याने बंगालच्या उपसागरातील चक्रीय वाऱ्यांच्या स्थितीमुळे राज्यातील विदर्भ आणि मराठवाड्यात हा पाऊस होऊ शकतो, अशी शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) व्यक्त केली आहे.**

पुढील चार ते पाच दिवस राज्यात पावसाची फारशी शक्यता नसली. तरी देशातील अनेक भागांमध्ये पावसाचे वातावरण मात्र कायम आहे. त्यामुळे उत्तरेकडील पंजाब, हरियाणा, जम्मू-काश्मीर, छत्तीसगड, पान २ वर

### राज्यात उकाडा वाढला

राज्यात ढगाळ वातावरण असल्याने अनेक भागांमध्ये उकाडा कायम आहे. प्रामुख्याने विदर्भातील जिल्ह्यांमध्ये उच्चांकी तापमान पाहायला मिळत आहे. मागील २४ तासांमध्ये राज्यातील अकोला या ठिकाणी उच्चांकी ४२.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. तर विदर्भातील जिल्ह्यांमध्ये सध्या उष्णतेची लाट कायम असून, अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या तापमानाचा पारा ४० अंशाहून अधिक नोंदवला गेला आहे. विदर्भात प्रामुख्याने नागपूर, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, वाशीम, अमरावती, अकोला या जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंशांहून अधिक आहे. तर मराठवाड्यातील परभणी, बीड, या जिल्ह्यांसह दक्षिण महाराष्ट्रातील सोलापूर या जिल्ह्यात तापमान ४० अंशांहून अधिक नोंदवले गेले आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३० मार्च २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ३२.५० क्विंटल | २,२४० | ३,१२० | २,५८७ |
| ज्वारी/हायब्रिड :१०४.०० क्विंटल | १,५०० | ३,३९० | २,५९५ |
| मूग :०.५० क्विंटल | ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| तूर : ३.५० क्विंटल | ४,००० | ९,६०० | ७,२७५ |
| उडीद : २.०० क्विंटल | ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| बाजरी: ७.०० क्विंटल | २,३०१ | २,७६० | २,५६३ |
| चिंचोका/लोकल: ४.०० क्विंटल | १,९०० | १,९०० | १,९०० |
| सोयाबीन: ७४.०० क्विंटल | ४,४०० | ४,४११ | ४,४०२ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,३५० | ५,४५० | ५,३८३ |


# महाराष्ट्रात बालमृत्यू दर घटला!

## संयुक्त राष्ट्राने दिलेले उद्दिष्ट पुर्ण करण्यात आले यश

पुणे । प्रतिनिधी

**गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील बालमृत्यूच्या दरात लक्षणीय घट झाल्याचे निदर्शनास आले आहे. विविध संस्थांनी केलेल्या सर्वेक्षण व अहवालानुसार, २०१८ मध्ये राज्याचा बालमृत्यू दर हा प्रति एक हजार २२ इतका होता, आता तो १८ वर आला आहे. तर, नवजात मृत्यूदर हा प्रति एक हजार १३ इतका होता, तो आता ११ पर्यंत कमी झाला.**

संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास ध्येयानुसार, सन २०३० पर्यंत नवजात मृत्यू दर १२ पेक्षा कमी करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले होते.



महाराष्ट्रात हे उद्दिष्ट २०२० मध्ये गाठण्यात यश प्राप्त झाले. राज्यात माता व बाल आरोग्य संबंधित जनजागृतीमुळे आणि जनतेमध्ये वाढत असलेल्या जागरुकतेमुळे बालमृत्यूचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येत आहे. शिवाय गर्भवती आणि बालकांसाठी नोव्हेंबर विविध पातळीवर करण्यात आलेल्या संयुक्त प्रयत्नांचेही हे यश असल्याचे दिसून येते.

नवजात बालमृत्यू कमी करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ५३ विशेष नवजात शिशू काळजी कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. यामार्फत दरवर्षी अंदाजे ५० ते ६० हजार आजारी नवजात शिशू तसेच कमी वजनाच्या बालकांवर उपचार केले जातात. कक्षामध्ये 'कांगारू मदर केअर' पद्धतीचा वापर करण्यात येतो व उपचार करण्यात येतात. या उपक्रमाचा फायदा बालमृत्यू कमी होण्यासाठी झाला.

### गृहभेटींद्वारे बालकांच्या आरोग्याचा आढावा

आशा कार्यकर्तीद्वारे राज्यातील सर्व नवजात बालकांची गृहभेट घेण्यात येते. त्याद्वारे आरोग्याची तपासणी व गंभीर बालकांना उपचारासाठी संदर्भित करण्यात येते. या कार्यक्रमाअंतर्गत दरवर्षी अंदाजे १० लाख नवजात शिशूना गृहभेटी देण्यात येतात व अंदाजे ९० हजार आजारी बालकांचे निदान करून उपचार व संदर्भसेवा देण्यात येते.

## बहीण-भावासह भाचीचा अपघातात मृत्यू

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महिनाभरावर आलेल्या लग्नासाठी बस्ता बांधून बहिण आणि चिमुकल्या भाचीसह गावाकडे निघालेल्या तरूणाच्या दुचाकीला एसटीने धडक दिली. या भीषण अपघातात भावी नवरदेव तरूणासह त्याची बहिण आणि भाचीचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात अंबाजोगाई जवळ वाघाळा पाटीजवळ रविवारी सायंकाळी सात वाजता घडला आहे.

लातूर जिल्ह्यातील बिटरगाव तांडा (रा. रेणापुर) येथील सेवालाल पंडित राठोड (वय २१) या तरूणाचा येत्या २८ एप्रिल रोजी विवाह होणार होता. या विवाहाची सध्या जय्यत तयारी सुरू होती. लग्नाचा बस्ता बांधण्यासाठी सेवालाल रविवारी त्याची राडी तांडा (ता.अंबाजोगाई) येथील बहीण दिपाली सुनिल जाधव (वय २०( आणि वर्षाची भाची त्रिशा यांना घेवून अंबाजोगाईला आला होता. लग्नाचा बस्ता बांधून बहिण आणि भाचीला घेवून सेवालाल सायंकाळी दुचाकीवरून परत गावाकडे निघाला होता.ते वाघाळा पाटीजवळ आले असता समोरून येणार्या लातूर-छ.संभाजीनगर बसने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण आपघातात बसखाली दुचाकी फरफटत जावून सेवालाल, बहिण दिपाली आणि पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# मुले जबाबदार होण्यासाठी पालकत्व समजावे लागते

समाज माध्यमांचा सामाजिक आणि लोकांच्या वैयक्तिक आयुष्यावर प्रभाव वाढत असताना पालकत्व अधिकाधिक आव्हानात्मक होत आहे. मूल्यसंस्कार, जबाबदाऱ्या, विचार यांची रुजवण कशी करायची, असे कळीचे प्रश्न पालकांना पडतात. मुलांवर त्यांच्या वयाच्या तिसऱ्या वर्षापासूनच जबाबदाऱ्या सोपवायला सुरुवात करावी. योग्य पर्याय निवडण्याचे भान त्यातून वाढते. मुलांना एखादी गोष्ट कोणत्या पद्धतीने अधिक परिणामकारक पद्धतीने समजावून सांगू शकू हे पालकांनी ठरवावे, असा सल्ला मानसतज्ज्ञ पालकांना देत आले आहेत. त्यांचा सल्ला पालकांनी गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

मुलांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याचा विचार पालकांना करावा लागेल. मुले कितीही मोठी झाली तरी पालकांच्या दृष्टीने ती लहानच असतात असे म्हटले जाते आणि ती भावना गौरवान्वित (ग्लोरिफाय) केली जाताना आढळते. हा विनोदाचा विषयसुद्धा आहे. काही काम सांगताना, तू आता मोठा झाला आहे असे पालक त्यांना ऐकवतात आणि त्याने पालकांचा अडचणीचा ठरू शकेल असा प्रश्न विचारला की, तू अजून लहान आहेस असे ऐकवून गप्प बसवतात. आम्ही छोटे आहोत की मोठे असा प्रश्न आम्हाला पडतो, असे मुले म्हणतात. वयाच्या तिशीतसुद्धा मुलांनी त्यांचेच ऐकावे, असा दुराग्रह अनेक पालक धरतात. पालकांना विचारून निर्णय घेणाऱ्या मुलांना समाज संस्कारी मानतो. तथापि त्या मुलांमध्ये निर्णय क्षमता विकसित झाली आहे की नाही हे तपासण्याच्या भानगडीत कोणीच पडत नाही. पालकांना विचारूनच सगळ्या गोष्टी मुलांनी कराव्यात अशीच बहुसंख्य पालकांची अपेक्षा असते. ही अपेक्षा मुलांमध्ये निर्णय क्षमता, बऱ्या-वाईटाची समज आणि विवेक विकसित होण्यातील मुख्य अडचण ठरत असावी का? तथापि मूल मोठे होण्याचे वय अलीकडे वाढत चालल्याकडे मानसतज्ज्ञ पालकांचे लक्ष वेधून घेतात. वयाच्या तिसऱ्या वर्षापासूनच मुलाला जबाबदार बनवण्याची प्रक्रिया सुरू करावी, असे तज्ज्ञांनी सुचवले आहे. असे करण्याचे अनेक फायदे असतात. मुले जबाबदारी घ्यायला आणि ती पार पाडण्यासाठी विचार करायला शिकतात. पालक त्याला मार्गदर्शन करतात तेव्हा ते सकारात्मकतेने स्वीकारायला, शांतपणे ऐकून घ्यायला आणि पालकांचा आदर करायला शिकतात. जबाबदारी सोपवताना आणि ती पार पाडल्यावर दोन कौतुकाचे शब्द पालकांनी वापरले तर मुले जबाबदारी आनंदाने स्वीकारायला आणि ती पार पाडायला शिकतील. मुलांना स्वातंत्र्य दिले तर त्यांच्या जाणिवांच्या कक्षा रुंदावतात आणि महत्त्वाचे म्हणजे या प्रक्रियेने त्यांच्यातील भविष्यातील सुजाण पालकदेखील कळत- नकळत घडत असतो. अर्थात, मुलांवर त्यांच्या वयाला अनुरूप काम सोपवण्याचा सुजाणपणा पालकांनी दाखवणेदेखील अपेक्षित आहे. अर्थात तेवढा समजूतदारपणा पालकांकडे असतोच असे मानले जाते. हा विश्वास किती पालक सार्थ ठरवतील? मुलांना जबाबदार बनवणे ही पालकांचीच जबाबदारी आहे. ती त्यांनी उत्तमपणे पार पाडली तर तरुण पिढी किंवा आजकालची मुले जबाबदार नाहीत, हा आक्षेप निदान काही प्रमाणात तरी आपोआपच निकाली निघू शकेल.

# कार्यकारी अभियंता लाड यांची सेवानिवृत्ती; भावपूर्ण निरोप

**बीड। प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता एम.आर. लाड हे नियत होयमानानुसार ३१ मार्च २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत ३२ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर ते सेवानिवृत्त झाले असून ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंतापदी त्यांनी ०७ महिने चांगले काम केले.**

मुळ पाटोदा तालुक्यातील चिखली येथील रहिवासी असलेल्या एम. आर.लाड यांची कनिष्ठ अभियंता म्हणून नांदेड जिल्हा परिषदेत प्रथम नियुक्ती झाली. नांदेड येथील ०३ वर्षाच्या कालावधीनंतर त्यांनी जालना येथे दोन वर्षे काम केले. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद ०४ वर्षे काम केले. छत्रपती संभाजीनगर येथुन सन २००९ मध्ये त्यांची बीड येथे यांत्रिकी विभागात उपाभियंता या पदावर बदली झाली. बीड येथे ०४ वर्षानंतर तर अहमदनगर जिल्हा परिषदेत त्यांनी सन २०१३ ते २०१५ पर्यंत काम केले. त्यानंतर त्यांची जालना जिल्हा परिषदेत बदली झाली. साडेतीन वर्षाच्या जालना येथील सेवेनंतर पुन्हा ते बीड येथे बदलून आले. बीड येथील यांत्रिकी विभागात त्यांनी उपअभियंता म्हणून ०४ वर्ष उल्लेखनीय सेवा झाली. ग्रामीण भागात



हातपंप बसविणे आणि दुरुस्ती यामध्ये त्यांचे काम उल्लेखनीय राहिले आहे. बीड जिल्हा परिषदेत ग्रामीण पुरवठा विभागात लाड यांनी चांगल्या पद्धतीने काम करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कामाची दखल घेऊन गेल्या ०७ महिन्यापासून ते कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत होते. सेवानिवृत्तीमुळे त्यांचा कार्यालयाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला यावेळी कनिष्ठ अभियंता यु.डी. बडे, शाखा अभियंता ए. आर. देशमाने, सहाय्यक लेखाधिकारी उत्तम सातपुते, कक्ष अधिकारी अनंत खेडकर, स्थापत्य अभियंता आर.डी. कोकीळ, कनिष्ठ लिपिक के. एम. हिवाळे, सचिन शरणागत, अंबुरे आदी उपस्थित होते.

# पंकजा मुंडे यांना माळी समाजास मते मागण्याच्या अधिकार नाही–संतोष रासवे

**माजलगाव । प्रतिनिधी**

मी ओबीसी समाजालीच आहे त्यामुळे त्यांचे प्रतिनिधीत्व करत असतांना त्यांचे प्रश्न, समस्या दूर करण्यासाठी प्रयत्नशील आहे अशी पोकळ वल्गना करणाऱ्या भाजप च्या लोकसभेच्या उमेदवार पंकजा ताई मुंडे या ना.छगन भुजबळ यांच्या बीड येथील ओबीसी महासभेला पाठ फिरवली होती म्हणून त्यांना माळी समाजास मते मागण्याच्या अधिकार नाही असे प्रसिद्ध पत्रक माळी समाजाचे नेते तथा बीड लोकसभेसाठी इच्छुक उमेदवार संतोष रासवे यांनी काढले आहे. प्रसिद्धि पत्रकात रासवे यांना पुढे म्हटले आहे की, मराठा समाजाच्या आरक्षण आंदोलनात बीड जिल्यातील माळी समाजाचे नेतृत्व सुभाष राऊत यांच्या हॉटेलला समाज कंटकांनी आग लावुन अतोनोत नुकसान



केले होते पण केवळ सहानभुती म्हणून पण पंकजा ताई मुंडे यांनी सुभाष राऊत यांची भेट घेतली नाही. यावरुनच पंकजा ताई यांची माळी समाजा विषयी किती आत्मयिता आहे हे लक्षात आले आहे. म्हणून त्यांचा हेकेखोर पणा व फाजील विश्वास मतदारां पुढे ठेऊन त्यांच्या विरोधात उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येईल. हा अर्ज दाखल करण्यासाठी माळी समाजातील सर्व संघटनेचा पाठिंबा मिळाला असुन लोक वर्गणीतून उमेदवारी जाहीर दाखल करण्यात येईल अशी माहिती संतोष रासवे यांनी दिली आहे.

## गेवराई येथे ट्रकच्या चाकाखाली सापडून बँक व्यवस्थापकाचा मृत्यू

**गेवराई । प्रतिनिधी**

**शहरातील एचडीएफसी बँकेचे सहाय्यक शाखा व्यवस्थापक यांचा अपघातात जागीच मृत्यू झाला. सोमनाथ राम लेंडगुळे (वय ३७, रा. छ. संभाजीनगर) असे मृत शाखा व्यवस्थापकाचे नाव आहे. ही घटना आज (दि.३१) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास जिल्हा परिषद शाळेसमोर घडली.**

लेंडगुळे हे गेवराई शहरातील एचडीएफसी बँकेचे सहाय्यक शाखा व्यवस्थापक म्हणून काम पाहत होते. मार्च एन्ड असल्यामुळे ते आज सुट्टी असतानाही बँकेचे दिवसभर कामकाज करत होते. सायंकाळी ड्युटी संपवून आपल्या दुचाकीवरून (एम एच २० सी झेड १८९६) घरी जात असताना त्यांचा तोल जाऊन गाडीसह महामार्गावर कोसळले. यावेळी ट्रकचे पाठीमागील चाक त्यांच्या डोक्यावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयात मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी पाठविण्यात आले आहे. रुग्णालयाबाहेर नागरिक व नातेवाईकांनी गर्दी केली होती. दरम्यान त्यांच्या पत्नीचा रविवारी वाढदिवस होता. पत्नीच्या वाढदिवसाची पोस्ट त्यांनी सकाळी आपल्या मोबाईलवर ठेवली होती. दरम्यान, गेवराई पोलिस ठाण्यात उशीरापर्यंत गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता.

# श्री साई पब्लिक स्कूल ही कलागुणांची खाण-सपोनि आण्णाराव खोडेवाड

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**शाळा हे ज्ञानमंदिर आहे. इथे शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या अंगातील सुप्तगुणांना पैलू पाडण्याचे काम केले जाते. त्यातूनच साहित्य, कला, क्रीडा, प्रशासन, राजकारण आदी क्षेत्रातील 'हिरे' जन्माला येतात. ग्रामीण भागातील श्री साई पब्लिक स्कूल ही शाळा ही सर्वार्थाने कलागुणांची खाण असल्याचे प्रतिपादन दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आण्णाराव खोडेवाड यांनी केले. शाळेच्या वतीने आयोजित दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.**

प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी लोणगाव येथील श्री साई पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन थाटात




संपन्न झाले. द्वितीय सत्राच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भूमी दर्शन सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव मुंडे होते उद्घाटक म्हणून सपोनि अण्णाराव खोडेवाड यांची उपस्थिती होती. देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर, सुनील काका मुंडे, व्यंकटेश ग्रुपचे अध्यक्ष प्रदीप ठोंबरे, एकनाथ मस्के, पत्रकार संतोष स्वामी, अमोल ठोंबरे, नवनाथ कांबळे आदींची उपस्थिती होती. यावेळी मुख्याध्यापक शरद चव्हाण, पर्यवेक्षक रवी चव्हाण, सौ. वर्षा गणेश सोळंके यांना 'बेस्ट टीचर्स अवॉर्ड' या पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. प्रथम सत्राच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अंजलीताई मुंडे तर उद्घाटक म्हणून श्रीमती सुनंदा कोरडे मॅडम उपस्थित होत्या. सौ.उषाताई सुनील मुंडे, सौ. शारदा सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.वर्षा सोळंके, सौ.ज्योती साळवे, रवी चव्हाण यांनी केले. यावेळी झालेल्या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमात चिमुकल्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती उत्तम आहे. या विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच क्रीडा, कला व स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केले जाते ही बाब प्रशंसनीय असल्याचे मत खोडेवाड यांनी व्यक्त केले. दोन दिवसीय स्नेहसंमेलनात जवळपास ८० गाण्यांचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध पेहरावत केलेले नृत्य या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. गायन , नृत्य, विनोदी नाटिका, ऐतिहासिक देखावे , देशभक्तीगीत, लोकगीते, लावणी, कोळीगित आदि मराठमोळी गाणी व पाश्चात्य नृत्य कलाविष्कार यासह मनोरंजन व प्रबोधन यांनी परिपूर्ण असा देखना सांस्कृतिक कार्यक्रम प्राथमिक व पूर्व प्राथमिक अशा दोन सत्रात साजरा करण्यात आला. संस्थेचे कार्यवाह लक्ष्मीकांत सोळंके व तिरुपती स्कूलचे प्रा.गणेश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या सर्व शिक्षक शिक्षीकांनी मुलांची तालीम व सराव करून घेतल्याने स्नेहसंमेलन यशस्वी झाले. यावेळी माता व पालकांसह प्रेक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# जेथलिया कुटुंब वैद्यकीय सेवेतही लोकांची मने जिंकतील

## जेथलिया हॉस्पिटलच्या उद्‌घाटन प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**माजलगाव । प्रतिनिधी**

**जेथलिया कुटुंबाने व्यवसाय, समाजकारण, राजकारण,पत्रकारिता क्षेत्रात जशी माणसं कमावली, मन जिंकली तशीच जेथलिया कुटुंबाची पुढची पिढी वैद्यकीय सेवेतही लोकांची मने जिंकतील असा विश्वास माजी ऊर्जा मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी जेथलिया हॉस्पिटलच्या उदघाटन प्रसंगी व्यक्त केले.**

जेथलिया हॉस्पिटल च्या उदघाटन कार्यक्रमात शुभ आशीर्वाद देण्यासाठी हभप महादेव महाराज चाकरवाडीकर, चंद्रशेखर शिवाचार्य महाराज तर अध्यक्षस्थानी आ प्रकाश दादा सोळंके प्रमुख अतिथी माजी आ मोहनराव सोळंके, माजी आ राधाकृष्ण होके पाटील, डॉ प्रकाश आनंदगावकर, सहाल चाऊस, कृबा सभापती जयदत्त नरवडे, दयानंद स्वामी, नितीन नाईकनवरे, ज्ञानेश्वर मेंडके, डॉ सुरेश साबळे,कल्याण आबूज, डॉ उद्धव नाईकनवरे, नासेर खान पठाण,उमेश मोगरेकर, तुकाराम येवले, डॉ मधुकर घुबडे, नानाभाऊ शिंदे, डॉ अशोकराव तिडके, अपासाहेब जाधव, कॉ मोहन जाधव,शेषराव फावडे, कृबा बीड चें सभापती अरुण डाके नाना, ढेकनमोह सोसायटी केअरमन बाळाप्रसाद जाजू अभय होके, राहुल जगताप ,प्राचार्य महेंद्र गोशाल, डॉ.गणेश पांगरकर शिवकमल हॉस्पिटल च्या डॉ सौ जाजू, डॉ नितीन उगले उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना क्षीरसागर म्हणाले की डॉ खुदा तो नहीं लेकिन खुदा से कम भी



नहीं असे म्हणत वाढत्या लोकसंखेला चांगल्या वैद्यकीय उपचाराची गरज असून चांगले उपचार डॉ ऋषिकेश जेथलिया हे करतील.यावेळी हभप महादेव महाराज चाकरवाडीकर, शिवाचार्य चंद्रशेखर महाराज यांनी आशीर्वाचन दिले डॉ सुरेश साबळे यांनी आपले शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले. भाशिप राधेश्याम लोहिया,माजी नगरवंक सतीश डुगड, माजी नगरसेवक गोविंद करवा,दयानंद तोशनिवाल, बाळाप्रसाद भूतडा, विनोद जाजू, गोविंद बजाज, राजेंद्र इंदानी, डॉ. तोष्णीवाल साहेब,समर्थ ऑइलचे संतोष तापडीया,अरूण राऊत, डॉ. शामसुंदर काकाणी, डॉ. श्रेयस देशपांडे, डॉ. श्री व सौ गिलबिले,डॉं मस्के साहेब, डॉ. युवराज कोल्हे ब, डॉं.उध्दव नाईकनवरे,डॉं अमोल परतुरकर, डॉं राहुलजी लडडा,कॉं मोहन जाधव, डॉं.दीपक कोडगिरकर, डॉ भोपळे,डॉमहेश मालपाणी, डॉ आनंद राठी, डॉ.कैलास नरवडे, डॉ दिनेश भूतडा, डॉ अनंत शेंडगे, डॉ नितीन मालपाणी,दत्ता महाजन,डॉं प्रशांत पाटील, नगरसेवक विनायक रत्नपारखी,अॅड.अभिलाष श्रीश्रीमाल, अॅड.माणिक श्रीश्रीमाल,बाळकिसनजी तापडिया, राधेश्याम जेथलिया,रोहित काबरा, लक्ष्मीनारायण मुंदडा लक्ष्मीकांत मानधने, दतप्रसाद मालपाणी, अविनाश गोंडे ,विजय जगताप,मोबीन खान,शेख मजिदभाई, मुजमिल पटेल,संतोष यादव, अविनाश गोंडे, डॉ गोपाल पाटील,जगदिशजी बजाज,बालाभाऊ तापडिया, चेअरमन वैशाली राठी, गजानन लाहोटी रमेश चांडक, कुलकर्णी सर डॉ पत्की, डॉ बाहेती,डॉं महेश मालपाणी, डॉ भोपळे, डॉ संदीप मुंडदा, डॉ रघुनानंदन चरखा,डॉ रत्नपारखी, रामेश्वर शर्मा,शिवप्रसाद भंडारी, दत्ता लड्डा,सागर करवा,संचालक नगरसेवक,सरपंच,उप सरपंच,माहेश्वरीसभा पदाधिकारी ,व्यापारी महासंघ पदाधिकारी पत्रकार बांधव या सोहळ्यास उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेशकुमार जेथलिया यांनी तर प्रसात्विक डॉ ऋषिकेश जेथलिया यांनी केले. आभार संतोषकुमार जेथलिया यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा सुदर्शन स्वामी, प्रा कमलकिशोर लड्डा,गोपाल मानधने, जय भंडारी, विष्णू पवार,नारायन गरगडे, अभिजित तौर यांनी परिश्रम घेतले.

## पान १ वरून...

### दुष्काळ राज्याच्या

यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत ८.९२ टक्के पाण्याची कमतरता आहे. राज्यातील नागपूर विभागात १६ लहान-मोठ्या धरणांची संख्या असून येथे ४८.८१ टक्के पाणीसाठा आहे. तर गेल्या वर्षी याच दिवशी येथील धरणांमध्ये २०.५५ टक्के पाणीसाठा होता. अमरावती विभागात देखील १० धरणांची स्थिती म्हणावी तशी चांगली नसून येथे ४५.४४ टक्के पाणीसाठा आहे. तर औरंगाबाद विभागात ४४ धरणांमध्ये सध्या २१.५२ टक्के पाणीसाठा शिल्लक असून गेल्या वर्षी तो ४३.०३ टक्के होता. यामुळे येथे सद्यस्थिती दुष्काळाची गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. नाशिक विभागात गेल्या वर्षी ५७.६३ टक्के पाणीसाठा होता. यात यंदा चांगलीत घट झाली असून सद्यस्थितीत येथे ३९.३३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. पुणे विभागात देखील स्थिती गंभीर असून येथे देखील पाणीसाठ्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे १२ टक्क्यांची घट झाली आहे. गेल्या वर्षी याच दिवसात पुणे विभातील धरणांमध्ये ४७.५२ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. तो यंदा ३६.६९ टक्क्यांवर आला आहे. तर कोकण विभागात ११ धरणे असून येथे ४४.७५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. जो गेल्या वर्षीच्या तुलनेत फक्त २.६५ टक्क्यांनी कमी झाला आहे. तर राज्यातील फक्त मोठ्या धरणांचा विचार केल्यास १३८ धरणांमध्ये ३७.५५ टक्के पाणीसाठा शिल्लक असून गेल्यावर्षी तो ४५.५४ टक्के होता. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने केलेल्या सर्वेक्षणानुसार राज्यातील ३५३ पैकी ३२ तालुक्यांमधील भूजल पातळी खाली गेल्याचे दिसून आले आहे. तर फक्त २ ठिकाणी भूजल पातळीत वाढ झाल्याचे उघड झाले आहे.

----------

### शरद पवारांची ज्योती मेटे

आहेत. त्यांना पाच लाखापेक्षा मते मिळालेली आहेत. त्यांच्याकडे कार्यकर्ते व तगडी यंत्रणा आहे, असे म्हणत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बजरंग सोनवणे यांनाच उमेदवारी देणे योग्य राहील अशी भूमिका शरद पवार यांच्यासमोर मांडली आहे. त्यामुळे बीडचा उमेदवार हा शरद पवार यांच्या मनावर की जयंत पाटील यांच्या पसंतीचा दिला जाईल हे येणाऱ्या काळात कळेल. त्यातच ज्योती मेटे यांनी शरद पवार यांची रविवारी मुंबईत भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये बराच वेळ चर्चा झाल्याचे समजते. या भेटीमुळे उमेदवारीच्या स्पर्धेत सध्या तरी मेटे आघाडीवर आहेत. सध्या तरी पंकजा मुंडे यांनी प्रचारामध्ये मोठी आघाडी घेतली असून महाविकास आघाडी अजूनही सर्वच बाबतीत पिछाडीवर असल्याचे चित्र आहे.

----------

### महाराष्ट्र सदन घोटाळ्याप्रकरणी

होती. आता या याचिकेवर उद्या सुनावणी होणार आहे. छगन भुजबळांना मिळालेली क्लीनचिट कायम राहणार की वेगळा काही निर्णय येणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले आहे. छगन भुजबळ सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना जारी करण्यात आलेल्या विविध कंत्राटामधून भुजबळ कुटुंबीयांच्या कंपन्यांना रोखरक्कम लाचेच्या स्वरुपात मिळाल्याचा आरोप होता. महाराष्ट्र सदन व इंडिया बुल्स प्रकरणात राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने स्वतंत्र गुन्हे दाखल केल्यानंतर सक्तवसुली संचालनालयाने भुजबळां विरोधात काळा पैसा प्रतिबंधक कायदान्वये दोन गुन्हे दाखल केले होते.

------------

### अवकाळी पाऊस पाठ सोडेना;

झारखंड, पश्चिम बंगाल आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये पावसाची शक्यता कायम असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. ३ एप्रिलनंतर देशातील पावसाचे वातावरण काहीसे निवळण्याची चिन्हे आहेत. असेही भारतीय हवामानशास्त्र विभागाने आपल्या अंदाजात म्हटले आहे. ७ एप्रिलनंतर महाराष्ट्रात पावसाचे वातावरण तयार होणार असले तरी देशपातळीवर मात्र अन्य राज्यांमध्ये हवामान कोरडे राहण्याची शक्यता अधिक आहे, अशी शक्यताही हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

----------

### केजरीवालांना अटक हा

पंतप्रधानांनी बरोबर केले का? केजरीवालजी हे खरे देशभक्त आणि प्रामाणिक व्यक्ती आहेत यावर तुमचा विश्वास आहे का? हे भाजपवाले म्हणतात की, केजरीवाल तुरुंगात आहेत, त्यांनी राजीनामा द्यावा का? तुमचे केजरीवाल सिंह आहेत, ते त्यांना जास्त काळ तुरुंगात ठेवता येणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. केजरीवाल यांच्या पत्नी सुनिता यांनी वाचून दाखवलेल्या पत्रात म्हटले आहे की, चला स्वप्नातला भारत घडवूया जिथे सर्वाना पोटभर अन्न, प्रत्येकाच्या हाताला काम चांगले आरोग्य, शिक्षण आणि सर्व सुविधा मिळतील. चांगल्या भारतात सर्वांना न्याय मिळेल. समाजात एकोपा असेल. गरीब लोकांना वीज मोफत मिळेल. प्रत्येक गावात सरकारी शाळा बनवू, प्रत्येक गावात मोहल्ला क्लिनिक बनवू. प्रत्येक जिल्ह्यात विशेष सरकारी रुग्णालय त्यामध्ये प्रत्येकाला मोफत उपचार मिळतील. शेतकऱ्यांसाठी स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार सुविधा देणार, दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा मिळवून देणार अशी आश्वासने अरविंद केजरीवाल यांनी कोठडीतून लिहलेल्या पत्राच्या माध्यमातून दिले आहेत. इंडिया आघाडीला संधी द्या, विकसित भारत घडवू या, असे आवाहन केजरीवाल यांनी केले आहे.यावेळी इंडिया आघाडीतील पक्षाचे प्रमुख नेते हजर आहेत. इंडिया आघाडीच्या या महासभेला कॉंग्रेस नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शरद पवार, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत, आरजेडीचे तेजस्वी यादव, सपा प्रमुख अखिलेश यादव, सीताराम येच्चुरी, डी राजा, पीडीपीच्या मेहबुबा मुक्ती, नॅशनल कॉन्फरन्सचे फारूक अब्दुल्ला झारखंडचे मुख्यमंत्री चंपाई सोरेन, हेमंत सोरेन यांच्या पत्नी कल्पना सोरेन, पंजाब मुख्यमंत्री भगवंत मान यांच्यासह अरविंद केजरीवालांच्या पत्नी सुनिता केजरीवाल देखील उपस्थित होत्या.

--------------

### मॅचफिक्सिंगसारखी भाजपने लोकसभा

मुख्यमंत्री हेमंत सोरेन मीडियावर दबाव आणला जात आहे. नेत्यांना धमकी दिली जात आहे पैशांची वापर करून सरकार पाडली जात आहेत. पण तुम्ही भारताचा आवाज दाबू शकत नाही. ऐन निवडणुकीत कॉंग्रेसची बँक खाती गोठवली आहेत. त्यामुळे प्रचारासाठी पैसे नाहीत, पोस्टर लावायलाही आमच्याकडे पैसे नाहीत. देशाला धमकावून सरकार चालवले जाऊ शकत नाही. भ्रष्टाचाराला संपविण्यासाठी इंडिया आघाडी लढत आहे. संविधान वाचविण्यासाठी आमची लढाई सुरू आहे, असे राहूल म्हणाले.

----------------

### भाजपची नववी

अभिनेता सनी देओलचे तिकिट रद्द करण्यात आले आहे. त्यांच्या जागी हंसराज हंस यांना तिकिट देण्यात आले. ५४३ सदस्यांच्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने आतापर्यंत ४१२ जागांसाठी आपले उमेदवार जाहीर केले आहेत. भाजपने पहिल्या यादीत १९५, दुसऱ्या यादीत ७२, तिसऱ्या यादीत ९, चौथ्या यादीत तामिळनाडूतील १४ आणि पुद्दुचेरीतील १ उमेदवारांची घोषणा केली होती. तर पाचवी यादी २४ मार्चला जाहीर करून १११ उमेदवारांची घोषणा केली होती. यात भाजपने पीलीभीतमधून वरुण गांधी यांचे तिकिट रद्द केले होते. भाजपने २६ मार्चला सहावी यादी जाहीर करून तीन, सातव्या यादीत दोन आणि आठवी यादी ३० मार्च रोजी जाहीर केली होती. यात त्यांनी अभिनेता सनी देओल याचे तिकिट कापले होते. लोकसभेच्या ५४३ जागांसाठी १९ एप्रिल ते १ जून दरम्यान सात टप्प्यांत निवडणुका होणार आहेत. ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे.

---------

### बहीण–भावासह

भाची त्रिशा यांचा जागीच मृत्यू झाला. सेवालाल आणि दिपाली हे त्यांच्या मातापित्यांचे एकुलते एक अपत्य होते. अपघाताची माहिती मिळताच नातेवाईकांनी स्वराती रूग्णालयात धाव घेतली. यावेळी नातेवाईकांचा आक्रोश पाहून अनेकांची मने हेलावली.

-----------------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



# शाळकरी मुलीचे अपहरण ;गुन्हा दाखल

**परळी :** अज्ञात व्यक्तीने शाळकरी मुलीस शालेय परिसरातुन अपहरण केल्याची घटना शहरातील औष्णिक वीज केंद्र वसाहती मध्ये घडली असून या प्रकरणी अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी संभाजी नगर पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार परळी-धर्मापुरी मार्गावर रेल्वे गेट जवळ वास्तव्यास असलेल्या एका शेतकऱ्याची मुलगी शालेय शिक्षण घेण्यासाठी परळी शहरातील औष्णिक वीज वसाहती मध्ये असलेल्या शाळेत नियमितपणे ये-जा करत असे.नेहमी प्रमाणे शनिवार (दि ३०) रोजी सकाळी शाळेत आली असता सकाळी ७:१५ ते १० च्या दरम्यान शाळेच्या गेट समोरून अज्ञान व्यक्तीने तिचे अपहरण केले. या प्रकरणी अपहरण झालेल्या मुलीच्या वडिल यांच्या फिर्यादी वरून बाबत संभाजी नगर पोलीस ठाण्यात गुरन ४३/२०२४ कलम ३६३ भादवि गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिंदे हे करीत आहेत.

# घाटनांदुर येथे रात्रभर वीज पुरवठा खंडित झाल्याने नागरिकांनी रात्र जागून काढली

## संतप्त नागरिकांनी अभियंत्याच्या रिकाम्या खुर्चीला घातला हार

घाटनांदुर । प्रतिनिधी

येथील दररोज अघोषित तीन तास वीज भारनियमन, सततच्या खंडित वीज पुरवठ्याने आधीच नागरिक त्रस्त झाले असल्याने त्यात ३० मार्च शनिवारी रोजी रात्रभर वीज पुरवठा खंडित झाल्याने संतप्त नागरिक वीज वितरणच्या कार्यालयात जाब विचारण्यास गेले असता अधिकारी व कर्मचारी गैरहजर असल्याने अधिकाऱ्याच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून अधिकारी व कर्मचाऱ्याच्या गलथान कारभाराचा ३१ मार्च रविवार रोजी निषेध केला. आगामी काळात सुधारणा केली नाही केली तर घाटनांदुर येथील महावितरण कार्यालयास कुलूप ठोकण्याचा इशारा नागरिकांनी दिला.



घाटनांदूरसह परिसरातील चौदा गावांना येथील ३३ के.व्ही वीज उपकेंद्रातून विद्युत पुरवठा करण्यात येतो. परंतु नियमित तीन तासांचे भारनियमन केले जात असल्याने त्यात दिवसातून बारा ते पंधरा वेळेस वीज पुरवठा खंडित होत असल्याने घाटनांदूरसह चौदा गावचे नागरिक त्रस्त झाले असताना ३० मार्च शनिवारी रोजी रात्री नऊ वाजता वीज खंडित झाली वीज पुरवठा दुसऱ्या दिवशी रविवारी सकाळी अकरा वाजता वीज पुरवठा सुरू झाला.रात्रभर वीज पुरवठा खंडित झाल्याने फैन, कुलर बंद झाल्याने घरात झोपावे गर्मी तर बाहेर झोपावे तर डासाच्या त्रासामुळे चौदा गावच्या नागरिकानी रात्र जागून काढली. उपेकंद्रात५ मेघा ओल्ट अम्पियरचा ट्रान्सफॉर्मर आहे. वीज पुरवठ्याच्या क्षमतेपेक्षा ट्रान्सफॉर्मर कमी क्षमतेचा असल्याने नियमित भारनियमन असल्याचे अधिकारी व कर्मचाऱ्याकडून सांगण्यात येते. नियमित तीन तासाच्या भारनियमन व्यतिरिक्त दिवसातून दहा ते पंधरा वेळेस वीज पुरवठा खंडित होते. कारण विचारले असता इन्कमिंग फिडरला कुठलेही सुरक्षिता उपकरण नसल्याने इन्कॅमर बंद पडून पूर्ण उपकेंद्राचा विद्युत पुरवठा खंडित होत असल्याचे सांगितले जाते. गेले अनेक महिन्यापासून यावर कोणतीही उपयोजना केली नसल्याने वीज ग्राहकांना खंडित विद्युत पुरवठयाचा त्रास सहन करावा लागत आहे.

घाटनांदुर येथील वीजपुरवठा दिवसातून पंधरा ते सोळा वेळेस सतत खंडित होत असल्यामुळे नागरिकांना व व्यापाऱ्यांना त्रास आहे येथील लाईटबिल वेळेवर भरणे आमचा गुन्हा आहे का अभियंता अधिकारी यांना आमचे सांगणे आहे की आम्हाला २४ तासा पैकी वीज पुरवठा खंडित न होता २० तास विज पुरवठा देण्यात यावा

-अमोल गोडबोले, घाटनांदुर


सहायक अभियंता मुख्यालयी राहत नसल्याने त्यांचा कर्मचाऱ्यांवर धाक नाही. अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याने कर्मचारी हि मुख्यालयी न राहत बाहेर गावाहून ये- जा करत असल्याने रात्री तांत्रिक बिघाड झाल्यास रात्रभर बिघाड दुरुस्त केला जात नाही. मुख्यालयी न राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या घर भता देण्यात येऊ नये. - शिवम पिंपळे, घाटनांदूर

# तलावाच्या जमिनीवर मूळ मालक दाखवू लागले हक्क

बीड । प्रतिनिधी

केस तालुक्यातील सारणी-सांगवी या तलावात पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने या ठिकाणचा गाळ शेतीमध्ये टाकण्यासाठी सांगवी येथील काही शेतकरी सांगवी-सारणी या तलावातून गाळ घेऊन जात आहेत .मात्र या जमिनीचे मूळ मालक या जमिनीवर आपला हक्क सांगून एका ट्रॅक्टरला दोनशे ते तीनशे रुपये वसुली करत आहेत .याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे अशी मागणी होत आहे.

सरकारी मालमत्तेवर परस्पर डल्ला मारण्याचे काम काही शेतकरी करताना दिसत आहेत. जिल्हाधिकारी श्रीमती दीपा मुधोळ-मुंडे यांनी काही दिवसापूर्वी जाहीर करून ज्या शेतकऱ्यांना तलावातील गाळ शेतात टाकण्यासाठी न्यायचा असेल त्यांना मोफत देण्यात यावा अशा सूचना केल्या होत्या. त्याप्रमाणे अनेक ठिकाणी शेतकरी स्वतःहून हा गाळ आपल्या ट्रॅक्टरने घेऊन जात आहेत. केज तालुक्यातील बीड रस्त्यावर असलेल्या सारणी- सांगवी तलावातील गाळही सांगवीचे काही शेतकरी घेऊन जात होते. मात्र सारणी



## गाळ नेणाऱ्या शेतकऱ्यांकडून २०० रुपये ट्रिपची अनाधिकृत वसुली सुरू


येथील ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या तलावात गेलेल्या आहेत. त्या शेतकऱ्यांनी गाळ नेणाऱ्या शेतकऱ्यांना गाळ नेण्यास मज्जाव करुन या जमिनी आमच्या आहेत गाळण्याचा असेल तर प्रत्येक ट्रीपला २०० ते ३०० रुपये द्यावे लागतील असे म्हणून अनाधिकृत रित्या वसुली सुरु केली आहे.या प्रकरणी सरकारी यंत्रणेने लक्ष घालणे गरजेचे आहे. एकदा तलावात तुमची जमीन गेली आणि त्याचा मावेजा मिळाल्यानंतर ही जमीन सरकारची होते. ही सरकारी मालमत्ता असतानाही त्याच्यावर कोणताही शेतकरी हक्क सांगू शकत नाही. तरीही अनधिकृत रित्या हे शेतकरी हक्क सांगून गाळ नेणाऱ्या शेतकऱ्यांकडून २०० ते ३०० रुपये वसुली करत आहेत .या प्रकरणी केजच्या तहसीलदारांनी लक्ष घालणे गरजेचे आहे .

जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला तिलांजली देण्याचा हा उद्योग असून यामुळे तलावातील गाळ काढण्याच्या प्रक्रियेला खिळ बसत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन शेतकऱ्यांना गाळ नेण्याचा मार्ग मोकळा करावा अशी मागणी सारणीचे शेतकरी आप्पासाहेब केदार ,रामेश्वर केदार ,गोरख धस, बळीराम धस गुरुमाऊली धस आदींनी केली आहे. याप्रकरणी आप्पासाहेब केदार यांनी केज तहसीलदारांची भेट घेऊन या संदर्भात मागणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# दिंद्रुड मध्ये सैलानी बाबाचा उर्स व संदल

दिंद्रुड । प्रतिनिधी

हिन्दु-मुस्लीम, बौद्ध बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील सैलानी बाबाचा प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी उर्स व संदल चा भव्यदिव्य असा कार्यक्रम होणार आहे. या उत्सवाची सुरुवात उद्या दि.०३ एप्रिल बुधवार रोजी होणार असून, सायंकाळी साडेपाच वाजता चादर, फुलांची आरास टाकून सजवलेल्या उंटावरून देवाची भव्य मिरवणूक काढण्यात येईल. त्यानंतर बाबा सैलानी च्या उर्स व संदल निमित्ताने रात्री साडेनऊ वाजता कवालीचा मुकाबला होईल. देवाच्या या सर्व कार्यक्रमास व धार्मिक सोहळ्याला सर्व जाती धर्मातील लोक बहुसंख्येने हजेरी लावतात.



जिल्ह्यासह परजिल्ह्यातून अनेक भक्तगण या देवाच्या दर्शनासाठी दरवर्षी नित्यनेमाने येतात त्यामुळे येथील दोन दिवसीय कार्यक्रमाला यात्रेचे स्वरूप येते.

सैलानी बाबा हे देवस्थान दिंद्रुड येथे बीड-परळी हायवे पासून मोहखेड रोड लगत आहे. या उत्सवास उपस्थित राहुन कवाली मुकाबला जुगलबंदी चा लाभ घ्यावा असे आवाहन बाबा सैलानी देवस्थान कमिटीचे पुजारी विष्णुपंत भानुदास सोनवणे व गणेश गिरधारी वाघमोडे यांच्यासह उर्स कमिटीने केले आहे. या उरुस कार्यक्रमाला दरवर्षी येणाऱ्या महिला-आबालवृद्ध भाविक भक्तांची मुक्कामी राहण्याची व इतर सोई-सुविधा कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे. अनेक भक्तगण मोठ्या श्रद्धेने आपापला नवस फेडण्यासाठी मंदिरात मोठ्या संख्येने उपस्थिती लावतात. भक्तांच्या उपस्थितीमुळे या भागात यात्रेचे स्वरूप येते.

# स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्थेमधील ४ कोटी ८४ लाख रुपयांच्या अपहार प्रकरणी तत्कालीन संचालक मंडळावर गुन्हा नोंद करून कारवाई करण्याचे न्यायालयाचे आदेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्थे मधील ४ कोटी ८४ लाख रुपयांच्या अपहार प्रकरणी अंबाजोगाई प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बोरफळकर साहेब यांनी तत्कालीन संचालक मंडळावर अंबाजोगाई शहर पोलीसांना गुन्हा नोंद करून कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

अंबाजोगाई येथील बहुचर्चित स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्थेत सन २०१३ ते २०१७ दरम्यान झालेला अपहार विशेष लेखा परिक्षक फिरते पथकाचे सतीश पोकळे यांनी सलग पाच वर्षाचे सर्व अहवाल आणि रेकार्डची तपासणी करून जे ऑडीट केले त्यामध्ये निदर्शनास आणला आहे. त्यांनी संबंधीत संचालक मंडळावर सदर अपहारा प्रकरणी गुन्हा नोंद करावा म्हणून फिर्याद देऊनही पोलीस प्रशासनाने संचालक मंडळी राजकीय दबाव वापरत गेले. तिन महिने गुन्हा नोंद करण्यासाठी टाळाटाळ केली होती. परंतु सदर पतसंस्थेत असलेले सदस्य भगवान दराडे यांनी दाखल केलेल्या फिर्यादी वरून न्यायालयाने सदरचे आदेश पारीत केले.

यातील आरोपींनी महसुल मंत्रालय मार्फत ऑडीटला स्थागिती मिळवलेली होती. परंतु यातील फिर्यादीने औरंगाबाद खंडपीठात धाव होऊन सदर अपहाराची बाब कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली व हायकोर्ट औरंगाबाद यांनी सदर स्थागितीवर तात्काळ सुनावणीचे आदेश महसुल मंत्रालयास दिले होते.

सदर सर्व कागदपत्राच्या व उच्च न्यायालयाच्या आदेशाचे अवलोकन करून मा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी बोरफळकर साहेब यांनी फौजदारी प्रकरण क्रमांक ५९४/२०२३ भगवान वि. शिवहर व ईतर मध्ये दि. २९/३/२०२४ रोजी पतसंस्थेचे तत्कालिन संचालक शिवहर एकनाथ भताने, दादासाहेब नानासाहेब पवार, सूर्यकांत बाबुराव धायगुडे, अंगद कोंडीबा घुले, शर्मा लक्ष्मणराव गायकवाड, गंगाधर इराण्णा केलुरकर, गिरीधर दशरद देशमुख, हरिश्चंद्र केशवराव चाटे, व्यंकटेश मुरलीधर गायकवाड, सुनील प्रभाकर धपाटे, सुनील भीमराव मेहेत्रे, प्रभावती तुकाराम अवचार, आशालता रवींद्र बोळे, पांडुरंग सोपानराव पांडे, भगत रामभाऊ विश्वनाथ, बाळकृष्ण ब्रम्हदेव चाटे यांच्या विरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीसांना गुन्हा नोंद करून कार्यवाही करण्याचे आदेश पारीत केला असून या आदेशामुळे पंतसंस्थांतील अनेक सदस्यांची झालेली आर्थिक फसवणूक उघडकीस येण्यास मदत होणार आहे. या प्रकरणी फिर्यादी तर्फे ऍड बालाजी निंबाळकर यांनी काम पाहीले त्यांना ऍड एस.ए.पांचाळ व ऍड बी बी किंर्दत यांनी सहकार्य केले.

# एमटीएस ऑलंम्पियाड राज्यस्तरीय स्पर्धेत अर्जुने भगिनीचे यश

माजलगाव । प्रतिनिधी

एमटीएस ओलंपियाड राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत अर्जुने भगिनीने यश मिळवले असून त्यामध्ये आवनी आनिल अर्जुने हीने ३०० माकी पैकी २८४ मार्क घेऊन राज्य पातळीवर ९५ टक्के मार्क होत २ सिल्वर मेडल रँक मिळविली तर बहीन अरोही अनिल अर्जुने हिने याच परीक्षेत ३०० पैकी २३४ मार्क घेउन राज्य पातळीवर ९ सिल्वर मेडल रँक मिळविली आहे. या दोन्ही बहीणीचे सर्वन आभिनंदन होत आहे.



या विषयी आधिक माहिती आशी कि, वरील दोन्ही गुली सतत कोनत्यान कोनत्या स्पर्धा परिक्षेत यश संपादन करीत आसमान या आगोदर महाराष्ट्र स्टॅलेंट सर्च परीक्षेत राज्य पातळीवरील गुणवत्ता यादीत अनुक्रमे १० वा व १२ वा कृमांक मिळविला होता धाराशिव (उस्मानाबाद) येथिल श्रीपतराव भोसले हायस्कुल मध्ये आवनी ही ७ वी मध्ये शिक्षण घेत आसुन आवनी ही ३रीच्या वगीत नुतन प्राथमिक विद्या मंदिर येथे शिक्षण घेत आहे आई वडिल दोथेही शिक्षक आसून तेच यांचा अभ्यास घेतात तसेच शिक्षक नेते उत्तम जोगदंड व पुरुषोत्तम पुरी येथील मुख्याध्यापिका अनिता जोगदंड हे आजी व आजोबा दोघेही शिक्षक आहेत यांच्या यशा बदल शाळेतील सर्व शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले आसून त्यांची अशीच प्रगती होवो आसा आशीर्वाद आजी व आजेबानी दिला आहे. त्यांच्या यशाची येथील पत्रकार वकील डॉक्टर शिक्षक यांनी अभिनंदन केले आहे.

# स्वानंदी प्रस्तूत सुरजन मासिक संगीत सभा उत्साहात संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

शहरात स्वानंदी परिवाराकडून शनिवारी दि.३० मार्च २०२४ रोजी सुरजन मासिक संगीत सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेसाठी प्रमुख कलाकार म्हणून संकेत शार्दूल (जालना) हे लाभले होते. या सभेला अध्यक्ष म्हणून उत्तम शिंदे हे लाभले होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने झाली.




सुरुवातीला लक्ष्मीप्रसाद पटवारी यांचे गायन झाले. यात त्यांनी मारुबिहाग या रागातील 'जागु मे सारी रैना' या बंदिशीने सुरुवात केली. त्या नंतर जयजयवंती रागात आडाचौताल मध्ये एक रचना सादर केली. तसेच 'यतिमन मम मानित त्या' हे नाट्यगीत व 'येरे कृष्णा तिरीच्या वसणाऱ्या' हे सांप्रदायिक पद सादर केले. यांना तबला साथ संकेत शार्दूल तर संवादिनी साथ कुणाल कुलकर्णी यांनी केली.

त्यानंतर प्रमुख कलाकार म्हणून लाभलेले संकेत शार्दूल यांचा तबला सोलो चे सादरीकरण झाले. यात त्यांनी सुरुवातीला ताल ' तीनताल ' मध्ये वादन केले. यामध्ये उठान, पेशकार, कायदे, फर्माईशी चक्रदार , तसेच तिस्त्र जाती मध्ये काही रचना रचनांचे सादरीकरण केले. त्यानंतर ताल 'रुपक' या तालामध्ये काही कायदे , रौ. चक्रदार इ. वादन केले. यांना लेहरा साथ लक्ष्मीप्रसाद पटवारी यांनी केली. या कार्यक्रमाचे निवेदन सुजाता रत्नपारखी यांनी केले. प्रस्ताविक ज्येष्ठ संगीत शिक्षक प्राणेश पोरे यांनी केले यामध्ये बोलताना स्व.नानाजी पालकर यांच्या नका संकटांना भिऊ,येऊ द्या ती। समर्थापुढे संकटे नम्र होती या ओळी सांगून प्रतिकूल परिस्थितीत सुरजनची वाटचाल सुरू आहे. त्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले. मान्यवरांचा परिचय सुबोध देशपांडे यांनी दिला. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा.स्नेहल पाठक, स्मिता लिंबगावकर, श्रीराम देशपांडे, संजय कुलकर्णी, शुभांगी आनंदगावकर, अभय देशमुख यांच्या सोबत सर्व संगीत साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही सभा यशस्वी होण्याकरिता चैतन्य आहेर व गणेश विभुते यांनी परिश्रम घेतले. अशाप्रकारे सुरजन मासिक संगीत सभा उत्साहात व आनंददायी वातावरणात संपन्न झाली.

# अंबाजोगाईला ७ एप्रिल रोजी मराठवाडा विभागीय गझल संमेलन ; संमेलनाध्यक्षपदी डॉ. इक्बाल मिन्ने यांची निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी


गझल मंथन साहित्य संस्था आणि बीड जिल्हा कार्यकारिणीतर्फे अंबाजोगाई (जि. बीड) येथे दि. ७ एप्रिल रोजी मराठवाडा विभागीय एक दिवसीय गझल संमेलन आयोजित केले आहे.



संमेलनाध्यक्ष
मा. डॉ. शेख इक्बाल मिन्ने



स्वागताध्यक्ष
डॉ. संतोष कुलकर्णी



उद्घाटक
मा. दगडूदादा लोमटे



प्रमुख अतिथि
मा. दास पाटील



प्रमुख उपस्थिती
मा.शिवदादा डोईजोडे

संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ गझलकार डॉ. शेख इक्बाल मिन्ने यांची निवड करण्यात आली आहे. स्वागताध्यक्ष जेष्ठ गझलकार डॉ. संतोष कुलकर्णी असून उद्घाटक म्हणून जेष्ठ साहित्यिक दगडूदादा लोमटे उपस्थित राहतील.

संमेलनाला प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ गझलकार दास पाटील आणि शिवदादा डोईफोडे उपस्थित राहणार आहेत. नवोदित गझलकारांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी गझल मंथन साहित्य संस्थेतर्फे विभागीय स्तरावर एक दिवसीय गझल संमेलन आयोजित केले जात आहे. या संमेलनात होणाऱ्या मुशायऱ्यांचे अध्यक्षपद गझलकार रत्नाकर जोशी, डॉ. राज रणधीर, मुकुंद राजपंखे, शेखर गिरी, मारुती मानेमोड,आत्तम गेंदे भूषविणार आहेत. तर सूत्रसंचालन गझलकार दिवाकर जोशी, आर. के. आठवले, चंद्रकांत कदम, आत्माराम जाधव, बापू दासरी, अविनाश कासंडे करतील.

या संमेलनात बीड, परभणी, लातूर, धाराशिव, नांदेड,च जालना, हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गझलकार सहभागी होणार आहेत. सहभागी गझलकारांना आकर्षक स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येईल. प्रास्ताविक अनंत देशपांडे करतील. मुख्य सूत्रसंचालन निशा चौसाळकर करतील. तर सजंय तिडके आभार मानतील. हे संमेलन ७ एप्रिल रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत नागापूरकर सभागृह, योगेश्वरी महाविद्यालय परिसर, अंबाजोगाई, जि. बीड येथे होणार आहे.

या संमेलनाचा गझल रसिकांनी आस्वाद घ्यावा, असे आवाहन गझल मंथन साहित्य य संस्थेचे अध्यक्ष अनिल कांबळे, उपाध्यक्ष वसुदेव गुमटकर, सचिव जयवंत वानखडे तसेच बीड जिल्हा कार्यकारिणी व मराठवाडा विभागीय कार्यकारिणीतर्फे करण्यात आले आहे.

# पत्रे कालबाह्य; टपाल पेट्यांची दुरावस्था!

## आधुनिक साधनांमुळे तत्काळ होतोय वार्तालाप; डिजिटल युगात पोस्टमन हरवत चाललाय..

ज्योतिराम पाढरपोटे । माजलगाव

पूर्वी ग्रामीण भागात पोस्टमनची हाक ऐकू आल्यावर लहान मोठे धावत यायचे. पोस्टमनचा आधार होत असे पत्र हाती पडताच घरातील मंडळी आनंदीत व्हायची.परंतु आता इंटरनेट,स्मार्टफोन मोबाईलमुळे व्हिडिओ कॉलिंग,फेसबुक, व्हॉट्सॲप,ट्विटर, ईमेल आदी आधुनिक साधनांमुळे तत्काळ वार्तालाप होत असल्यामुळे ग्रामीण भागात पोस्टमन ही ऐकू येणारी हाक आता कालबाह्य झाली आहे

गावोगावी तसेच शहरातील गल्लीबोळातील प्रत्येक परिवारातील सदस्य एका व्यक्तीची आतुरतेने वाट पाहात राहायचे.ती व्यक्ती म्हणजे खाकी गणवेशातील सायकलवर येणारा दारावर टकटक करणारा पोस्टमन. पण आता बदलत्या काळानुसार प्रतीक्षा करण्याची वेळ आता संपत चालली आहे.दारावर वाजणारा टकटक आवाज किंवा पोस्टमन हा शब्द कानी पडणे दुर्मिळ होत चालले आहे. पूर्वी पोस्टमनची हाक ऐकू आल्यावर लहान-मोठे धावत यायचे.पोस्टमनच्या हातात एखादा टेलिग्राम दिसला की मनात वादळ निर्माण व्हायचे.पत्रांमध्ये आनंद असो की दुःखाचा समाचार असो.सर्व शेजारधर्म पाळत होते.परंतु आताच्या काळात शेजारधर्म पाळण्यासाठी कुणालाही वेळ नाही. एकेकाळी पोस्टमन ग्रामीण भागात देवदूत समजले जात होते. अशिक्षित लोकांना पत्र वाचून दाखवणे मनीऑर्डरने आलेले पैसे घरोघरी पोहोचविणे हे पोस्टमनचं काम होते.पण आता मनीऑर्डर जवळपास बंद झाल्यातच जमा आहेत.परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे.त्यामुळे अत्यंत उपयोगी ठरलेली सेवा आता संपत आली आहे.सर्व काही ऑनलाईन झाल्यामुळे जुन्या गोष्टी कालबाह्य झाल्या आहेत.शेवटी काय तर अत्याधुनिक सेवेमुळे फायदा होत असला तरी माणूस माणसापासून दुरावत चालला आहे.हे मात्र नक्की. आजही जुने माणसे पोस्टमनबद्दल आपली आपुलकी दाखवितात.ते म्हणतात,आमच्या काळात गावात पोस्टमन आला तरी नागरिकांची त्यांच्याभोवती होणारी गर्दी ठरलेली असायची.आमचे काही आहे काय? आमचे पत्र आलेय काय? आमची मनीऑर्डर आली काय?असे पोस्टमनला विचारले जात होते.त्यामुळे पोस्टमनला विशेष महत्त्व होते.आता सध्याच्या काळात ग्रामीण भागात क्वचितच असे चित्र दिसून येते.पोस्टातील पत्र व गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी लावलेली टपाल पेटी आताच्या काळात दिसेनाशी झाली आहे.









## पत्रे कालबाह्य ;पोस्ट पेट्यांची दुरवस्था

पूर्वी आपल्या प्रिय व्यक्तींना किंवा आप्तांना पत्र लिहिण्यासाठी खास वेळ काढला जायचा. त्या पत्रांतील अक्षरांमध्ये भावनेचा ओलावा,मायेची गुंफण असायची. आता तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ई-मेल, एसएमएस,फेसबुक, 'व्हॉट्सॲप'व्दारा क्षणात संदेश पोचवता येत आहे.त्यामुळे एकेकाळी संपर्कासाठी मदतीला येणारी पत्रे आता कालबाह्य होत आहेत.त्यामुळेच पोस्टाच्या पेट्या पत्रांच्या प्रतीक्षेत असल्याचे चित्र दिसते.

शहरातील हानुमान चौकात असलेल्या पोस्टपेटीखाली आजुबाजूचे नागरिक कचरा जाळतात. त्यामुळे ही पेटी पूर्णपणे काळी झाली आहे. पेटीखालीच कचरा जाळत असल्यामुळे पेटीमध्ये टाकण्यात येणारे कागदपत्रे शाबूत राहतील का,हा प्रश्न असल्यामुळे या पेटीचा वापर करण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

## ओळखीचा लाल रंग उडाला

लाल रंग ही पोस्टाच्या पेटीची ओळख.शहरातील हानुमान चौकातील इमारतीजवळ असणाऱ्या पोस्टपेटीचा हा रंग उडाला आहे.ही पेटी बऱ्याच दिवसांपासून उघडली जात नसल्याचे येथील व्यवसायिक सांगतात. अगदी रस्त्यावर असणारी ही पेटी नागरिकांसाठी सोयीस्कर आहे.मात्र, पोस्टाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे त्याचा लाभ नागरिकांना होत नाही.

# कर्नाटकचा आंबा पुण्याच्या बाजारात; आंब्याच्या दरात मोठी घट!

पुणे : गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये आंब्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. विशेष म्हणजे पुण्यातील बाजार समितीमध्ये आंब्याच्या किंमती जवळपास २०० ते ३०० रुपये प्रति डझनपर्यंत घसरल्या आहेत. सध्याच्या घडीला महाराष्ट्रातील रत्नागिरी हापूस, तसेच रायगड आणि सिंधुदुर्गचा हापूस बाजारात मोठ्या प्रमाणात येत आहे. असे असतानाच शेजारील कर्नाटक राज्यातील 'लालबाग' आणि 'पयारी' प्रजातीचा आंबा देखील पुणे बाजार समितीमध्ये मोठ्या प्रमाणात येत आहे. परिणामी, कर्नाटकचा आंबा कमी दरात उपलब्ध असल्याने, राज्यातील हापूस आंब्याला त्याचा फटका बसत आहे.

साधारणपणे मार्च महिन्यापासून ते जून महिन्यापर्यंत बाजारात आंब्याची आवक मोठ्या प्रमाणात होते. यावर्षी वेळेआधीच आंब्याची आवक बाजारात मोठ्या प्रमाणात होत आहे. आवक लवकर सुरु होणे, ही यावर्षीच्या आंब्याच्या संपूर्ण हंगामासाठी धोक्याची घंटा मानली जाते. अर्थात वेळेआधीच आंब्याची आवक बाजारात वाढल्यानंतर, आंब्याचा हंगाम लवकर संपतो. ज्यामुळे यंदा देखील आंब्याचा हंगाम लवकर संपण्याची शक्यता अधिक आहे. आंबा बाजारातील व्यापाऱ्यांच्या म्हणण्यानुसार,



"सध्याच्या घडीला बाजारात कोकणातील रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधून आणि कर्नाटकमधून मोठ्या प्रमाणात आंब्याची आवक होत आहे. जी आश्चर्यजनक असून, हंगामाच्या मध्यानंतर, याउलट परिणाम होऊन आवक मोठ्या प्रमाणात घटू शकते."

### आंब्याच्या दरात ५० टक्के घट

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, यावर्षी आंबा उत्पादनासाठी पोषक वातावरण मिळाल्याने, तुलनेने अधिक उत्पादन झाले आहे. परिणामी, सध्या आंब्याला ९००-१५०० रुपये प्रति डझन इतका दर मिळत आहे. जो मागील वर्षी याच कालावधीत २००० ते २५०० रुपये प्रति डझन इतका मिळत होता. अर्थात यावर्षी आंब्याच्या दरात ५० टक्क्यांपर्यंत घसरण झाल्याचे सांगितले जात आहे. त्यातच येत्या काळात आंब्याच्या दरात आणखी घट होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत बाजारात तुलनेने अधिक आंबा उपलब्ध असल्याने, दरात मोठी घसरण पाहायला मिळत आहे.

# चवळी लागवड आणि प्रकार



महाराष्ट्रात चवळी मिश्र पीक म्हणून घेतळे जाते तर काही ठिकाणी पट्टे पध्दतीने लागवड केली जाते. अलिकडे मोठ्या शहरांच्या जवळपास भाजीच्या चवळीची ळागवड व्यापारीदृष्ट्या केली जाते. उन्हाळी पिकाची लागवड जानेवारी- मार्च तर खरीप हंगामात जून- जुलै महिन्यात करतात. तसेच बागायती पीक म्हणून हे पीक घेता येते.

चवळीचे तीन प्रकार आढळून येतात : १) लांब शेंगांची चवळी : यालाच बाली किंवा यार्डबीन म्हणतात, झाडे वेलीसारखी वाढतात. शेंगांची लांबी ३० ते ९० सें.मी. पर्यंत असते.२) गोल शेंगाची चवळी : या प्रकारात शेंगांची लांबी ७ ते १२ सें.मी. पर्यंत असते. बिया आकाराने लहान असतात.३) सर्वसाधारण चवळी : ही झाडे बुटकी ते मध्यम आकाराची असतात. काही जाती वेलीसारख्या वाढतात.

लागवड : चवळी लागवडीपूर्वी जमीन नांगरून, कुळवून भुसभुशीत करावी व त्यात हेक्टरी १५ ते २० टन शेणखत मिसळावे. त्यानंतर सोयीनुसार वाफे किंवा सर्या पाडाव्यात व बी टाकावे. दोन ओळीतील अंतर ४५ ते ६० सें. मी. ठेवावे आणि विरळणी करून दोन रोपात २० ते ३० सें. मी. अंतर ठेवावे. हेक्टरी १५ ते २० किलो बी लागते.

सुधारित जाती : १) कोकण सफेद : ही जात ७५ ते ८० दिवसात येणारी असून तिला हिरबी गार पालवी व पांढर्या रंगाची फुले येतात. शेंगा खालच्या अर्धा भागापर्यंत लागतात. ही जात विषाणूजन्य रोगास प्रतिकारक आहे. या जातीपासून १४ क्विंटलपर्यंत हेक्टरी उत्पादन मिळते.२) कोकण सदाबहार : ही जात बुटकी असून लबकर तयार होते. शेंगा व पाने हिरव्या रंगाची असून लवकर येणारी उपयुक्त जात आहे. या जातीपासून १३ ते १४ क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ३) पुसा- दो-फसली : ही जात उन्हाळी ब पाबसाळी या दोन्ही हंगामात घेता येते. झाडे झुडूपबजा वाढणारी असून शेंगाची लांबी १८ ते २० से.मी. पर्यंत असते. या जातीपासून ८० ते १०० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ४) अको गरीमा : या जातीच्या शेगांची लांबी २० ते २५ सें.मी. असून जाडी इतर चवळीच्या प्रचलित जातीच्या शेंगांपेक्षा जास्त असते. शेंगेत गराचे प्रमाण जास्त असल्याने भाजीसाठी ती जात उत्तम आहे. हेक्टरी १२० ते १५० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ५) पुसा कोमल : या जातीच्या शेगांची लांबी २० ते २२ सें.मी. पर्यंत असून, रंग हिरवा असतो. दाणा पांढरा, गोळ, लांबट आणि जाडा असल्याने उसळीसाठी ही जात चांगली आहे. शेंगांचे हेक्टरी उत्पादन १०० ते ११० क्विटलपर्यंत मिळते.

६) पुसा फाल्गुनी : शेंगा गडद -हिरव्या रंगाच्या १२ ते १५ सें.मी. लांब असतात. लागवडीपासून ६० दिवसात शेंगा काढणीस तयार होतात. हेक्टरी ८० ते ९० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ७) पुसा बरसाती : ही जात खरीप हंगामासाठी उपयुक्त आहे. शेंगेची लांबी २० ते २५ सें.मी. पर्यंत असते. ही जात लागवडीपासून ४५ दिवसात काढणीला तयार होते. हेक्टरी ७५ ते ८० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते.

# भारतीय फळे, भाजीपाल्याच्या निर्यातीत १६ टक्क्यांनी वाढ!

पुणे : आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय फळे आणि भाजीपाल्याची मागणी वाढली आहे. २०२३-२४ यावर्षीच्या एप्रिल ते फेब्रुवारी या ११ महिन्यांच्या कालावधीमध्ये फळे आणि भाजीपाल्याच्या निर्यातीत १६ टक्के वाढ नोंदवली गेली आहे. तर तर केळीच्या निर्यातीत ५० टक्क्यांनी वाढ नोंदवली गेली झाली आहे. यावर्षी अमेरिका नेदरलँड हे दोन देश भारतीय फळांचे सर्वात मोठे खरेदीदार बनले आहेत. तर युनायटेड किंग्डम हा भारतीय भाज्यांचा सर्वात मोठे खरेदीदार देश बनला आहे.

केंद्र सरकारने रशिया, ऑस्ट्रेलिया आणि इतर युरोपीय देशांना शेतमाल निर्यात करण्याचे धोरण अवलंबले आहे. यापूर्वी भारतीय फळे आणि भाजीपाला केवळ आखाती आणि आशियाई देशांमध्ये निर्यात केला जात होता. मात्र, सध्या रशिया, ऑस्ट्रेलिया आणि युरोपियन देशांमध्ये भारतीय फळांची मागणी दरवर्षी वेगाने वाढत आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार चालू आर्थिक वर्ष एप्रिल २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीमध्ये भारतीय फळे आणि भाज्यांच्या निर्यातीत १५.३८ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. तर केळीच्या निर्यातीत ५० टक्क्यांनी वाढ नोंदवली झाली आहे. जागतिक बाजारपेठेत भारतीय फळे आणि भाजीपाला निर्यातीचा वाटा सुमारे एक टक्का इतका आहे. अर्थात भारताला फळे आणि भाजीपाल्याच्या निर्यातीमध्ये खूप काम करणे आवश्यक आहे. सरकारच्या आकडेवारीनुसार, फळे आणि भाज्यांच्या निर्यातीत प्रामुख्याने हिरवी मिरची आणि केळी निर्यातीचे प्रमाण वाढले आहे. तर बटाट्याची निर्यातही बऱ्यापैकी होत आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रासह उत्तर प्रदेशातून देखील आंब्याची निर्यात रशियासह इतर देशांमध्येही हळूहळू वाढत असल्याचे सरकारच्या आकडेवारीवरून पाहायला मिळत आहे.



### या देशातून मोठी मागणी

वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, भारताने २०२३-२४ एप्रिल-फेब्रुवारी या आर्थिक वर्षात ३.२२ अब्ज डॉलरची फळे आणि भाज्यांची निर्यात केली आहे. यापूर्वी आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये याच कालावधीत फळे व भाजीपाल्याच्या निर्यातीचा आकडा २.७९ अब्ज डॉलर नोंदवला गेला होता. भारतीय भाजीपाल्याच्या खरेदीदारांमध्ये यूके, श्रीलंका, बांगलादेश आणि सौदी अरेबिया हे देश आघाडीवर आहेत. तर अमेरिका, नेदरलँड्स, इराण, इराक आणि यूएई या देशांमध्ये भारतीय फळांना सर्वाधिक मागणी आहे.

# उन्हाळी कोथिंबीर लागवड तंत्रज्ञान

कोथिंबीरीची लागवड भारतातील बहुतेक सर्व राज्यात केली जाते. कोथिंबीरीच्या विशिष्ट स्वादयुक्त पानांसाठी कोथिंबीरीला वर्षभर मागणी असते. मात्र कोथिंबीरीची लागवड प्रामुख्याने खरीप आणि रब्बी हंगामात केली जाते. उन्हाळी हंगामात कोथिंबीरीचे उत्पादन कमी असले तरी मागणी मात्र भरपूर असते. त्यामुळे कोथिंबीरीच्या लागवडीस चांगला वाव आहे. कोथिंबीर ही रोजच्या आहारात वापरली जाणारी महत्वाची पालेभाजी आहे. कोथिंबीरीच्या विशिष्ठ स्वादयुक्त पानावर इतर भाज्यांचा स्वाद वाढविण्यासाठी शाकाहारी तरी मांसाहारी पदार्थामध्ये कोथिंबीरीचा वापर करण्यात येतो. कोथिंबीरीच्या वडया चटणी आणि कोशिंबीर लोकप्रिय आहे.

हवामान आणि जमीन : कोथिंबीरीची लागवड कोणत्याही प्रकारच्या हवामानात करता येते त्यामुळे अतिपावसाचा प्रदेश वगळता महाराष्ट्रातील हवामानात वर्षभर कोथिंबीरीची लागवड करता येते. उन्हाळयात तापमान ३६ अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास कोथिंबीरीची वाढ कमी होते. कोथिंबीरीच्या पिकासाठी मध्यम कसदार आणि मध्यम खोलीची जमिन निवडावी. सेंद्रिय खते भरपूर प्रमाणात असल्यास हलक्या किंवा भारी जमिनीत कोथिंबीरीचे पिक चांगले येते.

सुधारीत जाती : नंबर ६५ टी ५३६५ एनपीजे १६ व्ही १ व्ही २ आणि को-१, डी-९२ डी-९४ जे २१४ के ४५ या कोथिंबीरीच्या स्थानिक आणि सुधारित जाती आहेत.

लागवडीचा हंगाम

कोथिंबीरीची खरीप, रब्बी आणि उन्हाळी अश तीनही हंगामात लागवड करतात. उन्हाळी हंगामात एप्रिल ते मे महिन्यात कोथिंबीरीचे उत्पादन घ्यावे.



लागवड पध्दती : कोथिंबीरीच्या लागवडीसाठी शेत उभे-आडवे नांगरुन चांगले भुसभुशीत करून ३२ मिटर आकाराचे सपाट वाफे बांधून घ्यावे. प्रत्येक वाफयात ८ ते १० किलो चांगली कुजलेली शेणखत टाकून मिसळून घ्यावे. वाफे सपाट करुन बी सारखे पडेल या बेताने फेकून पेरावे. बी खत मातीने झाकून हलके पाणी द्यावे. तणांचा प्रार्दुभाव जास्त प्रमाणात होत असल्यास सपाट वाफयांमध्ये १५ ते २० सेमी अंतरावर खुरप्याने उथळ ओळी पाडून बी पेरावे आणि नंतर मातीने झाकून घ्यावे. उन्हाळी हंगामात पेरणीपुर्वी वाफे चांगले भिजवून घ्यावे. आणि वाफसा आल्यावर बियाणे पेरावे. कोथिंबीरीच्या लागवडीसाठी हेक्टरी ६० ते ८० किलो बी लागते. पेरणीपूर्वी बियाण्यांवर चांगली उगवण होण्यासाठी प्रक्रिया करणे आवश्यक आहे. पेरणीपूर्वी धने फोडून बिया वेगळया कराव्यात यासाठी धने चपलेने अथवा लाकडी फळीने रगडून बी वेगळे करावे. तसेच पेरणीपूर्वी धन्याचे बी १२ तास पाण्यात उबदार जागी ठेवावे आणि नंतर लागवडीसाठी वापरावे. त्यामुळे उगवण १५ ते २० दिवसा ऐवजी ८ ते १० दिवसात होवून कोथिंबीरीच्या उत्पादनात वाढ होते आणि काढणी लवकर होण्यास मदत होते.

खते आणि पाणी व्यवस्थापन : कोथिंबीरीच्या पिकाच्या चांगल्या आणि जोमदार वाढीसाठी बी पेरताना हेक्टरी ३५ ते ४० गाडया शेणखत जमिनीत मिसळून द्यावे. कोथिंबीरीच्या पिकाला पेरणीच्या वेळी ५० किलो १५-५-५ हे मिश्रखत द्यावे. बी उगवून आल्यावर २०-२५ दिवसांनी हेक्टरी ४० किलो नत्र द्यावे. कोथिंबीरीचा खोडवा घ्यावयाचा असल्यास कापणीनंतर हेक्टरी ४० किलो नत्र द्यावे. कोथिंबीरीला नियमित पाणी देणे आवश्यक आहे. सुरूवातीच्या काळात बियांची उगवण होण्यापूर्वी वाफयाला पाणी देताना वाफयाच्या कडेने वाळलेले गवत किंवा उसाचे पाचट लावावे.

काढणी उत्पादन आणि विक्री : पेरणीपासून दोन महिन्यांनी कोथिंबीरीला फुले येण्यास सुरुवात होते. म्हणून त्यापूर्वी हिरवीगार आणि कोवळी लुसलुशीत असतानां कोथिंबीरीची काढणी करावी. साधारणपणे १५ ते २० सेमी उंच वाढलेली परंतु फुले येण्यापूर्वी कोथिंबीर उपटून अथवा कापून काढणी करावी. नंतर कोथिंबीरीच्या जुडया बांधून गोणपाटात किंवा बांबूच्या टोपल्यांमध्ये व्यवस्थीत रचून बाजारात विक्रीसाठी पाठवावी. पावसाळी आणि हिवाळी हंगामात कोथिंबीरीचे हेक्टरी १० ते १५ टन उत्पादन मिळते तर उन्हाळी हंगामात ६ ते ८ टन उत्पादन मिळते.

किड व रोग : कोथिंबीरीवर फारसे रोग आणि किडी दिसून येत नाही.काही वेळा मर रोगाचा प्रार्दूभाव होतो. भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी लांम सी एस-६ सारख्या भुरी प्रतिबंधक जातीचा वापर करावा. आणि पाण्यात विरघळणारे गंधक वापरावे.

## दिन विशेष

**जागतिक दिवस**
**एप्रिल फूल दिन**
**उत्कल दिवस, ओरिसा**

### महत्वाच्या घटना

१६६९ : उत्तर भारतातील देवालये तोडण्यासाठी औरंगजेब याने विशेष फौज तैनात केली.

१७५७ : प्लासीच्या लढाईत इंग्रजांनी बंगालच्या नबाबाचा पराभव केला. या विजयामुळे ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा पाया घातला गेला आणी ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीने कोलकाता काबीज केले.

१८८१ : लोकमान्य टिळकांनी संपादित केलेल्या 'मराठा' या दैनिकाची सुरूवात झाली.

१८८२ : पोस्टखात्याची बचत सेवा योजना सुरु झाली.

१८८५ : पुणे यथे फर्ग्युसन महाविद्यालय सुरू झाले.

१८८७ : मुंबई अग्निशमन दलाची स्थापना झाली.

१८९५ : भारतीय लष्कर स्थापन झाले.

१९०५ : मांचुरियातील पोर्ट ऑर्थर सिटी येथील लढाईत जपानी सैन्याने रशियाचा पाडाव केला. आशियाई देशाने युरोपातील देशाचा केलेला पराभव ही त्या काळातील अतिशय महत्त्वाची घटना होती.

१९२४ : रॉयल कॅनेडियन हवाई दल स्थापन झाले.

१९२८ : पुणे वेधशाळेच्या कामकजास प्रारंभ झाला.

१९३३ : भारतीय विमानदलाची स्थापना.

१९३५ : भारतीय रिझर्व बँकेची स्थापना.

१९३६ : मध्य प्रदेश उच्च न्यायालयाची स्थापना

१९३७ : रॉयल न्यूझीलंड हवाई दल स्थापन झाले.

१९४२ : दुसरे महायुद्ध जपानी फौजांनी मनिला, फिलिपाइन्सवर ताबा मिळवला.

१९४५ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी न्यूरेम्बर्ग, जर्मनी येथे तुफानी बॉम्बवर्षाव केला.

१९५४ : राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी 'भारतरत्न' पुरस्कारांची स्थापना केली.

१९५५ : गीतरामायणातील पहिले गाणे पुणे आकाशवाणीवरुन प्रसारित झाले. या दिवशी रामनवमी होती.

१९५७ : भारतात दशमान पद्धतीचा वापर सुरू झाला.

१९६९ : भारताचे पहिले अणुउर्जा केंद्र तारापूर येथे सुरु झाले.

१९७३ : कॉर्बेट नॅशनल पार्कमध्ये प्रोजेक्ट टायगरची सुरूवात झाली.

१९७६ : ऍपल इंक. कंपनी ची स्थापना झाली.

१९८९ : मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार सफदर हश्मी यांची नवी दिल्ली येथे पथनाट्य करत असतानाच निर्घृण हत्या

१९९० : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न प्रदान.

१९९८ : डॉ. सरोजिनी बाबर यांना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वसंत गोवारीकर यांच्या हस्ते सन्माननीय डी. लिट. पदवी प्रदान

२००० : पनामा सरकारने ८५ वर्षांच्या कालखंडानंतर पनामा कालव्याचा पूर्ण ताबा घेतला.

२००० : संत ज्ञानेश्वरांची प्रतिमा असलेल्या चलनी नाण्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते प्रकाशन.

२००४ : गूगलने जीमेल ही ई-पत्र प्रणाली सुरू केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५७८ : रक्ताभिसणाचा महत्त्वाच शोध लावणारा, वैदयकशास्त्राचा महान इंग्लिश संशोधक विल्यम हार्वे.

१६२१ : शिखांचे नववे गुरू गुरू तेग बहादूर यांचा जन्म. (मृत्यू: २४ नोव्हेंबर १६७५)

१८१५ : जर्मनीचे पहिले चॅन्सेलर ऑटो फॉन बिस्मार्क यांचा जन्म. (मृत्यू: ३० जुलै १८९८)

१८८९ : केशव बळीराम हेडगेवार, भारतीय हिंदुराष्ट्रवादी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक व पहिले सरसंघचालक.

१९०७ : भारतीय धार्मिक नेते व समाजसेवक शिवकुमार स्वामी यांचा जन्म.

१९१२ : हिन्दगंधर्व पण्डित शिवरामबुवा दिवेकर यांचा जन्म. (मृत्यू: २६ सप्टेंबर १९८८)

१९२० : पंडित रविशंकर यांचा जन्म

१९४१ : भारतीय क्रिकेट संघाचे नायक, अजित वाडेकर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९८४ : ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक पं. नारायणराव व्यास यांचे निधन. (जन्म: ४ एप्रिल १९०२ कोल्हापूर, महाराष्ट्र)

१९८९ : समाजवादी, कामगार नेते आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे अध्वर्यू श्रीधर महादेव जोशी यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १९०४)

१९९९ : भारतीय टपालखात्याच्या पिनकोड प्रणालीचे जनक श्रीराम भिकाजी वेलणकर यांचे निधन.

२००० : कवयित्री संजीवनी मराठे याचं निधन. (जन्म: १४ फेब्रुवारी १९१६)

२००३ : गायक आणि नट प्रकाश घांग्रेकर यांचे निधन.

२००६ : बालसाहित्यकार राजा मंगळवेढेकर याचं निधन. (जन्म: ११ डिसेंबर १९२५)

२०१२ : भारतीय राजकारणी, केंद्रीय मंत्री व बी. सी. सी. आय. चे अध्यक्ष एन. के. पी. साळवे याचं निधन. (जन्म: १८ मार्च १९२१)

# ग्रंथोत्सवात रंगले ज्येष्ठांचे कथाकथन; 'संप्या' ने खिळवून ठेवले रसिकांना

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग,ग्रंथालय संचालनालय, जिल्हा ग्रंथालय अधिकारी बीड कार्यालयाच्यावतीने आयोजित योगेश्वरी महाविद्यालय अंबाजोगाईतील नागापूरकर सभागृहात आयोजिलेल्या दोन दिवशीय ग्रंथोत्सव २०२३ मध्ये, आज शुक्रवारी दि.२९-०३-२०२४ रोजी बालकांच्या कथाकथनानंतर लागलीच जेष्ठांचे कथाकथन सत्र पाडले.त्यास श्रोत्यांनी भरभरुन दाद दिली. यात समेश मोटे यांनी 'दादू' ही शिक्षणाचे महत्व पटवून देणारी विनोदी कथा सादर केली.तर अर्चना स्वामी यांच्या 'शेवटची भेट' या कथेने डोळ्यात पाणी आणले. 'आयुष्याची संध्याकाळ' वयस्कर माणसांचे दुःख सांगणारी कथा पुरुषोत्तम नागरगोजे यांनी सादर कली. वाघिणीचे बछडे आणि त्यांच्या आईची झालेली ताटातूट 'पिंजरा' या कथेतून विठ्ठल जाधव यांनी मांडली.या सर्व कथाकारांनी आपल्या स्वतंत्र शैलीच्या सादरीकरणाने चांगलीच रंगत आणली.







कथाकथन सत्राचे अध्यक्ष गोरख शेंद्रे यांनी कथा लहान थोरांना उत्तमपणे चालायला ,बोलायला अन्? समर्थपणे उभं राहायला शिकवते असे प्रतिपादन करुन 'संप्या' ही पुराच्या वेढ्यात अडकलेल्या एका छोट्या मुलीला मुक्त करणा-या धाडसी मुलाची संवेदनशील,विनोदीआणि समाजातील व्यंगावर बोट ठेवणारी कथा आपल्या खास शैलीत सादर करुन श्रोत्यांना खिळवून ठेवले. सर्व कथाकारांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देवून सन्मानीत करण्यात आले. या सत्राचे उत्कृष्ठ सूत्र संचालन व आभार डॉ.शशिकांत पुरी यांनी केले. या प्रसंगी जिल्हा ग्रंथालय अधिकारी मा.संजय मस्के,ग्रंथालय निरीक्षक पुरूषोत्तम राऊत,यांच्यासह अनेक ग्रंथालय कर्मचारी,ग्रंथालय चालक व ग्रंथप्रेमी उपस्थित होते;त्याच प्रमाणे सभागृहात तरुण विद्यार्थी- विद्यार्थीनी, नामवंत कवी,कथाकार व रसिक श्रोत्यांची हजेरी होती.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बीड द्वारा आयोजित ''ग्रंथोत्सव- २०२३'' या कार्यक्रमाच्या निमित्ताने २८ मार्च रोजी निमंत्रितांचे कवीसंमेलन, नागापूरकर सभागृह, योगेश्वरी महाविद्यालय अंबाजोगाई , येथे संपन्न झाले. या कवीसंमेलनाच्या अध्यक्षपदी कला व विज्ञान महाविद्यालय, नांदूर घाट येथील हिंदी विभागाध्यक्ष साहित्यिक डॉ द्वारका गिते-मुंडे या होत्या. कवी आणि कवितेच नातं हे अटूट असतं. शब्दकळातून ते जन्माला येतं. कवीच्या प्रतिभाशक्तीचा, कल्पनाशक्तीचा तो एक अविष्कार असतो. अनुभूतीच्या अभिव्यक्तीचा झंकार असतो. भावलेल्या घटना प्रसंगाच त्यामध्ये प्रतिबिंब असतं. कवितेच शब्द सामर्थ्य वाचकांच-प्रेक्षकांचं लक्ष खेचून घेत असते. कारण शब्दांना नाद असतो. त्या नादात लय आणि संस्कार करण्याची क्षमता असते. कविता काय असते हे सांगताना त्या पुढे म्हणाल्या कविता थोडी काल्पनिक वास्तवदर्शी अधिक असते. काळजाला भेदणारी विषमतेची तिडीक असते. वर्तमानाचे भविष्य आणि समाजाच्या भल्यासाठी वेचलेलं आयुष्य असते. ती प्रसंगी विद्रोही बंडखोर, धगधगती ज्वाला असते. सर्वधर्मसहिष्णुता अन संविधानाची अस्मिता असते. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव, नवक्रांतीचा प्रवास असते. ज्याच्या त्याच्या प्रतिभेची बहरणारी पुष्पलता असते. स्वतःबरोबर इतरांना अंतर्मुख करायला लावणारी साहित्यकृती असते.

''जीवन आनंद'' ही कविता सादर करून स्त्रीची विविध रूपं, तिचा आदी अनादी काळापासूनचा संघर्ष आणि जीवनाचे आनंदी क्षण शोधण्याचा तिचा प्रयत्न त्यांनी आपल्या कवितेतून मांडला. मी प्रेरक कथा कविता, मधुर सुरेल गाणी। जीवनाच्या रंगभूमिची अधुरी प्रेम कहाणी। मी सागर सुखाचा, दुःख क्षितिजा पलिकडे। मज्जाव त्या षडरिपूंना, जीवन आनंद चोहीकडे। जीवन आनंद चोहीकडे।।या कवीसंमेलनामध्ये अनेक कवींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. काव्यसिकांनीही उत्स्फूर्तपणे दाद दिली. ज्येष्ठ कवी विश्वंभर वराट यांनी दुष्काळ आणि पाणी टंचाईच्या अनुषंगाने एक उपरोधिक कविता सादर करून पाणी वाचवण्याचा संदेश दिला. हास्य व्यंग्यात्मक कवितेच्या माध्यमातून पाण्याचे महत्व त्यांनी अधोरेखित केले. शेतीमातीच्या कवितेसोबत प्रेम, विरह, अपेक्षाभंगाच्या, सामाजिक आशयाच्या कविता कवींनी सादर केल्या. काळ्या आईचं वर्णन करणारी सुंदर रचना सुरेल आवाजात कवीने सादर करून वाहवा मिळवली. कवी राजेश रेवले आणि साहित्यिक अनंत कराड यांच्या बहारदार सूत्रसंचलनाने कार्यक्रमाची रंगत वाढवली. कवि राजेश रेवले यांनी कवितेला कोणताच विषय व्रज्य नसल्याचे सांगत. मसापचे गोरख शेंद्रे यांनी मुलगा आणि मुलगी नका करू भेद म्हणत स्त्री पुरुष समानतेचा संदेश देणारी कविता सादर करून उपस्थितांची मनं जिंकली. तसेच मायीची महती सांगणारी एक कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. वडिलांच्या माघारी मुलांसाठी आई आणि बापाची भूमिका पार पाडणाऱ्या कणखर आईची महती त्यांनी आपल्या या कवितेतून मंडली. कोवळ्या कळ्या गर्भातच मारण्याचा जो प्रयत्न बीडमध्ये मागच्या काही वर्षांमध्ये झाला यावर भाष्य करणारी व त्या मागचं गुपित खोलणारी ''गुपित'' ही कविता सादर करून साहित्यिक आनंत कराड यांनी स्त्री-भ्रूण हत्या या विषयावर लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. पुरुषी मानसिकता आणि समाजवास्तव त्यांनी आपल्या कवितेतून मांडले. कवीसंमेलनाच्या अध्यक्षा डॉ द्वारका गीते यांनी ''ओळख बीड जिल्ह्याची'' ही कविता सादर करून ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून बीड जिल्ह्याची अलीकडच्या काळात झालेली ओळख अधोरेखित केली. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी मा.संजय मस्के, मसापचे डॉ भास्कर बडे, गोरख शेंद्रे आणि जिल्ह्यातील विविध ग्रंथालयांचे अध्यक्ष, ग्रंथालय कार्यकर्ते आणि काव्यरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

### फेक न्यूज ची माहिती देण्यासाठी नागरिकांना आवाहन

बीड : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या कालावधीमध्ये ३९ बीड मतदारसंघातील 'फेक न्यूज'ची माहिती देण्यासाठी ८७८८९९८४९९ हा स्वतंत्र क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. नागरिकांनी यावर फेक न्युज ची माहिती व्हॉट्सअप करावी. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला असून आचारसंहिता लागू झाली आहे. याकाळात उमेदवारांची प्रचारा दरम्यान बदनामी करणे, अफवा पसरविणे, द्वेषपुर्ण संदेश, खोटे संदेश तसेच प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया, सोशल मिडियाद्वारे प्रसारित होणाऱ्या फेकन्युजची माहिती नागरीकांकडून मिळण्यासाठी हा ८७८८९९८४९९ स्वतंत्र मोबाईल क्रमांक माध्यम प्रमाणिकरण व संनियत्रन समिती आणि मीडिया कक्षाकडून जाहीर करण्यात आला आहे. या क्रमांकावर व्हॉट्सअप करावे. ८७८८९९८४९९ या क्रमांकावर नागरीकांकडून मिळालेल्या माहितीची नियंत्रण कक्षाकडून तसेच बीड सायबर पोलीस यांच्या मदतीने शहानिशा करुन आवश्यक कारवाई करावी करण्यात येईल.

### जयभिम महोत्सवात स्पर्धांचे आयोजन

बीड : भारतीय संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धांमध्ये स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन जयभिम महोत्सव समिती बीडकडून करण्यात आले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून (दि.१) ते (दि.१४) एप्रिल या कालावधित बीडमध्ये जयभिम महोत्सव साजरा होतो. त्या अनुषंगाने याहीवर्षी कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. या जयभीम महोत्सवात रविवार (दि.७) एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता तुलसी महाविद्यालयात महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा तर दुपारी २ वाजता सामाजिक न्याय भवन येथे वक्तृत्व स्पर्धा,सोमवार (दि.८) रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत सामाजिक न्याय भवन येथे महिलांसाठी विविध स्पर्धा, मंगळवार (दि.९) रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत सामाजिक न्याय भवन येथे भीमगीत गायन स्पर्धा, गुरुवार (दि.११) रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ विद्रोही कवी संमेलन सामाजिक न्याय भवन येथे होणार असून शुक्रवार (दि.१२) रोजी तुलसी महाविद्यालयात सकाळी ६ ते रात्री १२ या वेळेत अठरा तास अभ्यास तर सामाजिक न्याय भवन येथे सकाळी १० ते सायंकाळी ६ नृत्य स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी समितीकडे नाव नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले असून नागरिकांनी या स्पर्धा पाहण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

## जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून शासनाच्या आदेशाला केराची टोपली

बीड । प्रतिनिधी

जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड येथील शासकीय अधिकारी-कर्मचारी कार्यालयात उपस्थित नसतात. उपायुक्त तथा सदस्य असताना जाती प्रमाणपत्र पडताळणी विभागाचा कार्यभार संशोधन अधिकारी व कंत्राटी कर्मचारी यांचे वरच चालतो. शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवणाऱ्या उपायुक्त व क्लार्क यांच्यावर कारवाई करणेसाठी समाजकल्याणचे आयुक्त यांच्याकडे तक्रार केली आहे तसेच बार्टीचे महासंचालक यांची प्रत्यक्षात भेट घेऊन तक्रार करणार आहे. **-अजय सरवदे**

बीड जिल्ह्यात अनोख्या गोष्टी घडत असतात गेल्या अनेक दिवसांपासून जिल्हा जातपडताळणी विभाग चर्चेत आला आहे त्यामध्ये पुन्हा आणखीन एक भर पडली आहे. शासनाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत अनुसूचित जातीच्या प्रवर्गासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात.

सदर योजनांसाठी वित्तीय वर्ष २०२३-२०२४ मध्ये मंजूर तरतूदीपैकी शिल्लक रकमेची देयके कोषागारात सादर करण्यासाठी व लेखाविषयक कामकाजाकरिता दि. २९ मार्च २०२४ ते दि. ३१ मार्च २०२४ या कालावधीत सर्व कार्यालये सुरु ठेवण्यात यावीत तसेच सदर कालावधीमध्ये कार्यालय प्रमुखांनी मुख्यालयी उपस्थित राहण्याचे आदेश दिले होते. जिल्हा जातपडातळणी विभागाचे उपायुक्त तथा कार्यालयीन प्रमुख व क्लार्क हे ३० व ३१ तारखेला गैरहजर असल्याचे दिसून आले तसेच तीनही दिवस कंत्राटी पद्धतीने काम करणारे सर्व कर्मचारी व संशोधन अधिकारी हे मात्र तत्परतेने हजर राहिले. संबधित उपायुक्त आणि क्लार्क यांच्यावर शासनाचे आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई करण्याची मागणी वंचितचे अजय सरवदे यांनी थेट ई-मेलद्वारे समाजकल्याण विभागाचे आयुक्त यांचेकडे तक्रार केली आहे.

## पाणी व चाऱ्याची समस्या सोडविण्यासाठी त्वरीत उपाययोजना करा-सुरेश पाटील

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यासह ग्रामीण भागात मार्चचोवटचा आठवडा संपत आलेला असतानाच पाणीटंचाईच्या झळा जानवू लागलेल्या आहेत. पिण्याच्या पाण्याची व जनावरांच्या चाऱ्यांची समस्या निर्माण होणार असल्याने प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहून त्वरित उपाययोजना करण्याचा आदेश आपल्या स्तरावर सर्व अधिकारी कर्मचारी विशेषः तलाठी, मंडळाधिकारी, ग्रामसेवकांना द्याव्यात अशी सूचना शिव संघर्ष ग्रुप महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी तथा ज्येष्ठ पत्रकार सुरेश पाटील यांनी तहसीलदार व गटविकास अधिकारी यांना दिल्या.

ग्रामीण भागातील खाजगी मालकीचा उपलब्ध पाणीसाठा असल्यास विहिरी व हातपंप अधिग्रहण करून पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेता उपाययोजना कराव्यात तसेच



दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यास चाऱ्याचाही प्रश्न गंभीर निर्माण होऊ शकतो यासाठी चाऱ्याची व्यवस्था शेतकऱ्याच्या दावणीला करण्याची प्रस्ताव शासनाला पाठवावा जेणेकरून शेतकऱ्यांच्या पशुधनाचा चारा व पाण्याची व्यवस्था होऊ शकेल. कोणत्याही अधिकाऱ्याने निवडणुकीच्या आचारसंहितेचे कारण न सांगता ग्रामीण भागातील माणसे व जनावरे सांभाळण्याचे काम करावे असेही आदेश समाजसेवक सुरेश पाटील यांनी तहसीलदार व गटविकास अधिकारी यांना दिले.

## लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदान महत्त्वाचे - प्रा.पवार

बीड । प्रतिनिधी

लोकशाहीमध्ये मतदानाला सर्वश्रेष्ठ स्थान आहे लोकशाही बळकट करण्याची जबाबदारी सुजान नागरिक म्हणून आपणा सर्वांची आहे. नव मतदारांनी जास्तीत जास्त प्रमाणामध्ये नावे नोंदवून मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग घ्यावा. मतदानाची टक्केवारी वाढवावी आणि लोकशाही व्यवस्था मजबूत करावी असे आवाहन पीव्हीपी महाविद्यालयाचे लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा. डॉ.शरद पवार यांनी केले.

येथील सावरकर महाविद्यालयामध्ये निवडणूक साक्षरता मंच आणि लोकप्रशासन विभागाच्या वतीने ''सार्वत्रिक निवडणुकीमध्ये युवकांचा सहभाग'' या विषयावर आयोजित व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. शरद पवार बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर हे होते. पुढे बोलताना डॉ. शरद पवार म्हणाले की निवडणुकीच्या दिवशी प्रत्येक मतदाराने मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. आपल्या अडीअडचणी समस्या सोडवणारे लोकप्रतिनिधी निवडून दिले पाहिजे. मतदानामध्ये सहभाग वाढवण्यासाठी युवकांनी पुढे येऊन जनजागृती केली पाहिजे.जागृत मतदार हे समृद्ध लोकशाहीचे लक्षण आहे. अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर म्हणाले की आपण आपल्या परिसरातील सर्व मतदारांना मतदान करण्यासाठी आवाहन करून मतदानाचे प्रमाण वाढवले पाहिजे. वयाचे अठरा वर्षे पूर्ण झालेल्या युवक, विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी केली पाहिजे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. ज्योतेश्वर भालेराव यांनी निवडणूक प्रक्रियेत मतदाराची भूमिका कशी असते हे मांडले. आणि युवकांनी निवडणूक प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा असे सांगितले. प्रमुख अतिथींचे स्वागत प्राध्यापक नारायण शिंदे, प्राध्यापक संतोष वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक राम गव्हाणे यांनी केले तर आभार डॉ. छत्रपती पांगरकर यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## डॉ.यशराज भावले यांचा राजुरी गावकऱ्यांच्या वतीने सत्कार

राजुरी । प्रतिनिधी

यावेळी अध्यक्ष स्थानी भगवान बहिर, सुरेश बनकर, सर्व ग्रामपंचायत सदस्य नवगण राजुरी तसेच गावातील व्यापारी ,प्रतिष्ठित नागरिक ,युवक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. यावेळी यावेळी मनोगतामध्ये सय्यद यांनी डॉक्टर भावले यांच्याकडून समाजाची गावकऱ्यांची गोरगरिबाची सेवा व्हावी ही इच्छा व्यक्त केली तसेच विलास भावले यांनीही कमी दरात जास्तीत जास्त सेवा देण्याची इच्छा व्यक्त केली.



यशराज भावले यांचे वडील छबुराव भावले यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की यावेळी माझ्या मुलाचा जो सत्कार केला त्याबद्दल सर्व गावकऱ्यांचे प्रथम आभार व्यक्त करतो जी काही गावातील सर्व समाजातील लोक गुन्हा गोविंदाने या ठिकाणी राहतात इथे कुठल्याही समाजाचा मुलाचं अभिनंदन करणे हे प्रथम कर्तव्य समजून गावातील प्रत्येक नागरिक हा सत्कारासाठी पुढे येतो त्यामधून नवीन पिढीला प्रेरणा मिळते आणि त्या प्रेरणे मधूनच मुलांमध्ये निर्माण होते याठिकाणी जी काही शैक्षणिक चळवळ चालू झाली त्यामध्ये केशर काकू शिरसागर यांचा फार मोठा वाटा आहे त्यांनी शिक्षणाचा राजुरी या गावांमध्ये रोपट लावलं आणि त्याचा आज वटवृक्ष होताना दिसून येत आहे नवे गोरगरब जनतेचे त्यांच्यामुळेच शिक्षण घेऊन मोठमोठ्या पदावर मुले गेलेले आहेत यावेळी अध्यक्षीय भाषणामध्ये भगवान बहिर यांनी जे काही गावातील बरेचसे बरेचसे मुलं वेगवेगळ्या क्षेत्रात लागलेले आहेत त्यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात येतो त्यामध्येच यशराज याने पण यशस्वीरित्या संपादन केलेला आहे त्याबद्दल त्यांचा गाव कार्य तर्फे सत्कार करत असताना आमचे काही देणं आहे तसं त्याचंही गावकऱ्यांसाठी काही देणं आहे ते देत असताना त्यांनी गावातील गरीब जनतेची होता होईल तेवढी सेवा मोफत करावी असे मी गावकऱ्यातर्फे विनंती करतो यानंतर डॉक्टर यशराज यांनी सत्काराला उत्तर देताना म्हणाले की राजुरी ही माझी जन्मभूमी आहे आणि जन्मभूमीच्या लोकांना पहिला मान म्हणून जास्तीत जास्त मोफत व कमी दारात सेवा करण्याची या ठिकाणी मी ग्वाही देतो कार्यक्रम प्रास्ताविक संजय गावडे यांनी केले आभार प्रदर्शन डॉक्टर बलवंत भावले यांनी केले.

# सुख दुःखाची जाणीव करून देणारा महिना म्हणजेच रमजान-जयदत्त क्षीरसागर

रायमोहा । प्रतिनिधी

येथे ॲड.अब्दुल जब्बार खान पठाण यांच्या कुटुंबाच्या वतीने गेल्या पंधरा वर्षापासून रमजान इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. हा इफ्तार म्हणजेच हिंदू मुस्लिम बांधवांचे स्नेहसंमेलन म्हणून घेतला जातो. द्वेष, मत्सर वाढू नये, धर्म कुठलाही असो एकमेकात भाईचारा ठेवून धर्म समजून घ्यायला हवा जातीभेद विसरून प्रत्येकाने आपले सण उत्सव साजरे करायला हवेत सुखदुःखाची जाणीव करून देणारा महिना म्हणजे रमजान महिना असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी रायमोहा या ठिकाणी ॲड.अब्दुल जब्बार खान पठाण, अमानुल्ला खान पठाण, सुलेमान खान पठाण, उमर खान पठाण या बंधूंच्या वतीने रोजाइफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, विलास बडगे, दिनकर कदम, माजी नगरसेवक मुखिद लाला, सतीश काटे, सुधाकर मिसाळ, सुभाष क्षीरसागर, नानासाहेब काकडे आदिंची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, रमजान





महिन्यानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे रायमोहा येथे रोजा इफ्तार ठेवला जातो, जी गोष्ट समजायला आणि आचरणात आणायला कठीण असते अशा गोष्टी टाळून सर्व समाज बांधवांनी एकत्र येऊन आपले सण उत्सव साजरे करायला हवे. धर्माच्या नावावर अनेक जण आपली दुकानदारी करत असतात आपण आपल्या जीवनात जे सण साजरे करतो त्याचे स्वरूप वेगळे आहे. हिंदू बांधवांमध्ये दिवाळी, दसरा, त्याचप्रमाणे मुस्लिम धर्मातही रमजान पाळला जातो. महिनाभराचा उपवास काय शिकवतो. उपाशी राहणे किती कठीण असते पोटाची आग काय असते दुःख समजून घेण्यासाठी हा महिना आहे. कुराण ग्रंथाचे वाचन करून आपल्या विचारात बदल करून चांगल्या कामाचा संकल्प या महिन्यात केला जातो. या भागात मला मोठे पाठबळ मिळालेले आहे शिरूर आणि रायमोहा परिसरात सातत्याने आपण विकास कामे करत आलो आहोत. म्हणूनच त्याच हक्काने मताचे दान ही मागायला येत असतो आधी करावे लागते आणि मग मागावे लागते त्यानुसार आपण आपली वाटचाल करत आलेलो आहोत. सत्ता ही कायम सातबारावर लिहिलेली नसते ती पेन्सिलने लिहिलेली असते हे प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवे आणि मतदानातून दान मागतो ते केवळ आम्ही केलेल्या कामावर आणि दिलेल्या सेवेवरच आणि या भागातून तसे पाठबळही आतापर्यंत मिळाले असल्याचे ते म्हणाले. यावेळी जालींदर सानप, सुरेश जाधव, दादासाहेब मुंडे, कलंदर पठाण, नवनाथ सानप, हाफिज मोईन, सलीम खान, अक्षय रणखांब, विजय सरवदे, प्रकाश इंगळे, संजय सानप, आयुब शेख, प्रभाकर सानप, मीनाताई उगलमुगले, तुकाराम धनगुडे, अमन शेख, निजामोद्दीन तांबोळी, सखाराम जाधव, भागवत सानप, देवीदास कंठाळे, बाळू कंठाळे, शेख इजारोद्दीन यांच्यासह हिंदू मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

बीड । प्रतिनिधी

बिंदुसरा, कर्झनी,शिवणी, लिंबारुई तलावांची आणि पिंपळनेर पाण्याची टाकीमधील पाणीसाठा पाहणी करताना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे, निर्देश जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी शनिवारी दिले. शनिवारी जिल्हाधिकारी यांनी बिंदुसरा, कर्झनी,शिवणी, लिंबारुई, पाली, पिंपळनेर पाण्याची टाकी येथील तलावांची तसेच पाण्याची टाकीच्या पाणीसाठयाची पाहणी केली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांशी आणि ग्रामस्थांशी पाणी बचतीविषयी चर्चा ही केली.

सध्या जिल्ह्यात पाणी टंचाई असून उपलब्ध पाणीसाठा नळाद्वारे अथवा टँकरद्वारे पिण्यासाठी, दररोजच्या वापरासाठी, शेती, फळबागांसाठी उपयोगी पडणार असून हे पाणी पावसाचे पाणी येईपर्यंत पुरविणे आहे.

पाणीसाठ्याचा अवैध उपसा होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सक्त सूचना जिल्हाधिकारी यांनी यावेळी केल्या. यासह अधिक काटकसरीने पाण्याचा वापर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले. या दौऱ्याच्या वेळी तहसिलदार बीड नरेंद्र कुलकर्णी,नायब तहसीलदार सुहास हजारे, गट विकास अधिकारी अनिरुद्ध सानप, नागरगोजे, चांदणे, मंडळ अधिकारी शीतल चाटे, शेळके, तलाठी गायकवाड, ग्रामसेवक आदी उपस्थित होते.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

सोमवार दि.०१ एप्रिल २०२४ | ६



# माझा नेता पलटूराम निघाला!

## बारामतीमधून माघार घेणाऱ्या विजय शिवतारेंना कार्यकर्त्याचं खरमरीत पत्र

**पुणे । प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदारसंघात पवार घराण्याविरोधात लढणे, ही नियतीने मला दिलेली असाईनमेंट आहे. मी कोणत्याही परिस्थितीत बारामतीमधून माघार घेणार नाही, अशी गर्जना करणाऱ्या विजय शिवतारे यांनी आपली बंडाची तलवार नुकतीच म्यान केली होती. वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केल्यानंतर विजय शिवतारे ( ) यांनी बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणूक लढवण्याचा निर्णय मागे घेतला होता. मी केवळ एकनाथ शिंदे यांनी अडचण होऊ नये, म्हणून बारामतीमधून लढण्याचा निर्णय मागे घेत आहे, असे विजय शिवतारे यांनी सांगितले होते. विजय शिवतारे यांनी पत्रकार परिषदेत एकप्रकारे बारामतीमधून ( ) माघार घेण्याच्या आपल्या निर्णयाचे समर्थन केले होते. मात्र, सध्या सोशल मीडियावर विजय शिवतारे यांच्या समर्थकाच्या नावाने एक पत्र व्हायरल होत आहे. विजय शिवतारे यांच्या कट्टर कार्यकर्त्याने लिहलेले हे पत्र सध्या सोशल मीडियावर चांगलाच चर्चेचा विषय ठरत आहे. या पत्रातून संबंधित कार्यकर्त्याने विजय शिवतारे यांना खरमरीत भाषेत जाब विचारला आहे.


विजय शिवतारेंना कार्यकर्त्याने लिहलेलं पत्र वाचा जसच्या

पुरंदरचा तह...

प्रति,

श्री. विजय बापू शिवतारे, शिवसेना नेते, पुरंदर

स.न.वि.वि. बापू, १३ मार्च २०२४ रोजी तुम्ही बंडाची भूमिका घेवून बारामती लोकसभेची निवडणूक अपक्ष लढवण्याचा निर्धार केला. त्यानंतर मिडीयाने तुम्हाला अगदी डोक्यावर घेतलं. दर अर्ध्या तासाच्या बुलेटीनला 'तुमची' स्फोटक विधाने गाजू लागली. चॅनेल कुठलंही लावा दिसणार फक्त शिवतारे बापू हे ठरलेलं. त्यानंतर तुम्ही जेजुरीच्या खंडोबाच्या साक्षीने एल्गार पुकारला. पुढे तुमचे दौरे, भेटीगाठी, पत्रकार परिषद गाजू लागल्या. तुम्ही सुद्धा अगदी 'राणा भीमदेवी थाटाने बोलत राहिलात. आरोप, टीका-टिप्पणी करू लागलात. काहीही झालं तरी आता माघार नाही, बारामती कोणाची जहागिरी नाही' यासह तुमची अनेक विधाने गाजली. तुम्हाला समर्थक मिळाले. माय-बाप जनता, पदाधिकारी कार्यकर्ते यांची वज्रमूठ तुम्ही उभी केली. प्रसंगी शिवसेनेचा राजीनामा देवू, पण, आता निर्णय घेतलाय, हि तुमची भूमिका अवघ्या महाराष्ट्रात गाजली. घोडा-मैदान जवळ आलं असताना बापू, तुम्ही ३० मार्च २०२४ रोजी अचानक माधार घेतली आणि आमचीही मोठी अडचण झाली.



अजित पवारांची गुर्मी तशीच आहे. ते उर्मट आहेत. पण, अजित पवारांना तो पश्चात्तापही नाही. जणू काही लोकांना फसवणे हा त्यांचा जन्मजात अधिकार असल्या सारखे ते वागत आहेत. इथून मतदान घेऊन त्या ओरावर राज्यात, देशात ब्लॅकमेलिंग केलं जात आहे. हा ब्रह्मराक्षस आम्हीच तयार केला आहे. या पापाचं परिमार्जन आम्हा मतदारांनाच करावं लागेल. या रामायणातला रावणाच्या विरोधात लढणारा रामाच्या बरोबर असणारा विभीषण विजय शिवतारे आहे, अशीही टीका बापू तुम्हीच केली होती. मात्र, आज तुम्हाला अजित पवारांचा काय साक्षात्कार झाला आहे? आता तुम्ही रामायणातले विभिषण आहात की नाही? हेही आम्हाला कळू द्या. बापू, पवारांच्या विरोधातल्या ५ लाख ८० हजार मतदारांनी आता नेमकं काय करायचं? आता तुम्हाला अजित पवार उर्मट व नालायक वाटत नाहीत का ? तुमच्याचं भाषेत त्यांची गुर्मी आणि माज उतरला आहे का? सुनेत्रा पवार या अजित पवारांच्या पत्नी आहेत, म्हणून आम्ही त्यांना मतदान द्यायचं का? त्यांचं कॉलिफिकेशन काय? असा प्रश्न तुम्हीचं उपस्थित केला होता. मग आता आम्ही मतदार म्हणून सुनेत्रा वहिनींना मतदान कारायचं का आणि कशासाठी? यावरही बापू तुम्हीचं अधिकारवाणीने प्रकाश टाकला तर बरे होईल. बापू, मी तुमचा कट्टर समर्थक आहे. तुमच्या राजकीय प्रवासात कायम तुमच्या पाठीशी उभा असतो आणि राहीन सुध्दा. तुम्ही म्हणाल तसं आजपर्यंत करीत आलो आहे. २०१९ ला सुध्दा अजित पवार यांच्या समर्थकांशी तुमच्यामुळे भांडलो आहे. कारण, तुम्ही माझे नेते आहात. पण, काल माझा नेता असा संधीसाधू, लेचापेचा, छक्के पंजे करणारा आणि पोटात एक आणि ओठात एक असणारा निघाला, याचं फार वाईट वाटलं. बापू, ज्या मिडीयाने तुम्हाला डोक्यावर घेतलं, त्याचं मिडीयाने तुमची लया फार घालवून टाकलं. सोशल मिडीयात तर तुम्हाला महाराष्ट्राचा पलटूराम म्हणून हॅशटॅग फिरवला जात आहे. पुरंदरचा मांडवली सम्राट', पाकीट भेटलं का?, घुमजाव, शिवतारे जमी पर, चिऊतारे', 'शेवटी, आपला आवाका दाखविला', '५० खोके शिवतारे ओके, अशा खोचक कंमेंटचा सोशल मिडीयात मुसळधार पाऊस पडतो आहे.

अजित पवारला माझा आवाका कळेल? म्हणणारे तुम्ही आवकका दाखविण्याच्या आधीच 'शेपूट घातलंत. मुख्यमंत्र्यांना माझ्यामुळे अडचण होत आहे, हे खतगावकर यांनी सांगितले. असं बाळबोध समर्थन करणाऱ्या विजय शिवतारेंना हे आधी समजलं नव्हतं का? आता त्या ५ लाख ८० हजार पवार विरोधी मतदारांनी नेमकं काय करायचं? हे तुम्ही सांगू शकाल का? तुम्ही स्वतः हा घटनाक्रम घडवून आणला की, तुमचा बोलविता धनी दुसराच कुष्णी होता? तुम्ही कुणाची स्किए वाचत होतात? आता तुमची वैयक्तिक भूमिका काय? आज तुमची राजकीय विश्वासार्हता शिलनक आहे का? तुम्ही म्हणजे 'फाड़ा पोस्टर निकला चूहा' नव्हेत का? आदरणीय बापू, याचीही उत्तरे तुम्ही दिलीच पाहिजेत. असो, हे सगळं वाचून तुम्हाला राग येईल. तुमची चिडचिड होईल. पण, बापू तुमचा कार्यकर्ता म्हणून समर्थन केलं. तेव्हा अख्खा गावानं दस्तुरखुद्द अजित पवार यांच्या समर्थकांनी व कार्यकत्यांनी मला वेडयात काढलं आणि तुम्हाला पोपटलाल म्हटलं. त्यामुळे चिडून मी सर्व पै पाहुणे, नातेवाईक, आप्तेष्ट, सगेसोयरे, मित्र परिवार, गावात आणि तालुक्यात तुमचा प्रचार केला. तुमची भूमिका लोकांना समजावून सांगितली. पण, आज तुम्ही माघार घेतली आणि माझी गोची झाली. आता लोक फोन करून माझ्यासह तुमचाही उद्धार करू लागलेत. त्यामुळे मी फोन बंद करून बसलोय म्हणून आता तुम्ही एखादी पत्रकार परिषद घेऊन या सगळ्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या. तसाही पत्रकार परिषद घेऊन 'गोंधळ' घालण्याचा तुम्हाला जुनाच नाद आहे. अडचण होत आहे.असो जमेल तेवढं करा ओ. माझी अडचण होत आहे. तुर्तास तरी थांबतो.

कळावे आपला, कट्टर कार्यकर्ता

# धाराशिवमध्ये ओमराजेंविरोधात कोण लढणार? मुंबईत हालचालींना वेग

## राणा जगजीत सिंह पाटील फडणवीसांच्या तर सुरेश बिराजदार अजितदादांच्या बंगल्यावर

**धाराशीव । प्रतिनिधी**

उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघातून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांना पुन्हा एकदा उमेदवारी जाहीर केली आहे. दरम्यान, उस्मानाबाद लोकसभेची जागा महायुतीमध्ये कोणाच्या वाटेला येणार? यावर अद्याप शिक्कमोर्तब झालेला नाही. उस्मानाबादच्या जागेबाबत चर्चा करण्यासाठी तुळजापूरचे आमदार राणा जगजीत सिंह पाटील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला सागर बंगल्यावर गेले आहेत. तर दुसरीकडे सुरेश बिराजदार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीसाठी देवगिरी बंगल्यावर पोहोचले आहेत.

महायुतीमध्ये उस्मानाबादची जागा कोणाच्या वाटेला?

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेकडून ओमराजे निंबाळकर तर राष्ट्रवादीकडून राणा जगजीत सिंह पाटील आमने-सामने होते. या निवडणुकीत ओमराजे निंबाळकरांनी मोठा विजय मिळवला होता. महायुतीमध्ये उस्मानाबादची जागा शिवसेनेच्या वाटेला येत होती.



मात्र, विद्यमान खासदार ठाकरेंच्या गटात आहेत. त्यामुळे या जागेवर अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा दावा आहे. मात्र, राणा जगजीत सिंह पाटील यांच्या प्रवेशाने भाजपची या मतदारसंघात काही अंशी ताकद वाढली आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षही या जागेची मागणी करु शकतो. त्यामुळे अजित पवारांनी ही जागा लढवली तर सुरेश बिराजदार निवडणूक लढवू शकतात. भाजपने लढवली तर पुन्हा एकदा राणा जगजीत सिंह पाटील मैदानात उतरतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

अजित पवारांकडून सुरेश बिराजदार तर भाजपकडून राणा पाटील इच्छुक


अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून सुरेश बिराजदार लोकसभा लढवण्यासाठी इच्छुक आहेत. मात्र, आजवर त्यांच्या पाठी विधानसभा किंवा लोकसभा लढवण्याचा अनुभव नाही. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यालोकसभा मतदार संघावर एनसीपी अजित पवार गट दावा करत आहे. मात्र राणा जगजित सिंह पाटील भाजपा तर्फे त्या मतदार संघात लढण्यासाठी इच्छुक आहेत. त्यासाठी त्यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. मात्र दोघांमध्ये चर्चा काय झाली हे गुलदस्त्यातच आहे. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे उमेदवार पद्मसिंह पाटील यांनी उस्मानाबादतून विजय मिळवला होता. त्यानंतर २०१४ मध्ये मोदी लाटेत शिवसेनेचे उमेदवार रवींद्र गायकवाड यांनी विजय मिळवला. शिवाय, २०१९ च्या निवडणुकीतही शिवसेनेनेच बाजी मारली होती. शिवसेनेचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांनी २०१९ मध्ये मोठा विजय मिळवला होता.

# ज्योतीताई मेटे लोकसभा निवडणुकीत सक्षम उमेदवार -राजेंद्र आमटे

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला निवडणूक जिंकण्यासाठी स्वर्गीय दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांच्या सुविध्या पत्नी ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी महा विकास आघडीच्या वतीने निवडून येऊ शकतात अशी जन सामान्याची भावना आहे.

बीड जिल्हा मध्ये परिवर्तनाची खूप मोठे लाट निर्माण झाली आहे नागरिक महागाई, बेरोजगारी,व घराणेशाही ने त्रस्त आहेत तीच



### संपूर्ण जिल्ह्यामध्ये परिवर्तनाची लाट

माणस वारंवार निवडून देऊनही विकास नाही.

बीड मध्ये सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन बीड चा सर्वांगीण विकास करण्यासाठी ज्योतीताई मेटे सक्षम उमेदवार आहेत ज्योतीताई उच्च शिक्षित आहेत भारतीय जनता पक्षाच्या घराणेशाही उमेदवाराच्या विरोधात मेटे ताईच निवडून येऊ शकतात. देशाच्या परिवर्तनाची सूरवात बीड लोकसभा क्षेत्रा पासून होऊ शकते असे प्रतिपादन राजेंद्र आमटे यांनी केले.

राजेंद्र आमटे
शिवसंग्राम शेतकरी आघाडी

# नाना पटोलेंचा भाजपशी छुपा संबंध -प्रकाश आंबेडकर

**मुंबई । प्रतिनिधी**

''नाना पटोलेंच्या आयुष्यातील दुर्दैवाचा दिवस आहे, असं मी मानतो. आम्ही सात जागांवर काँग्रेसला पाठिंबा दिला. त्यानंतर काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्याने दोन जागांवर पाठिंबा द्या, असं कळवलं. त्यानंतर कोल्हापूर आणि नागपूरच्या जागेवर आम्ही पाठिंबा जाहीर केला. आमच्या पाठिंबामुळे कोण विजय होणार आणि कोण पराभूत होणार हा भाग वेगळा आहे. मात्र,नाना पटोलेंनी पत्रकार परिषद घेतली. त्यामध्ये काँग्रेस उमेदवार विजयी होणार म्हणून त्यांना प्रचंड दु:ख झालं'', असं वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर म्हणाले. अकोला येथे प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते बोलत होते.




काँग्रेसने भंडारा-गोंदियातून लोकसभा निवडणूक लढण्यास सांगितली होती

आम्ही नागपूरच्या जागेवर पाठिंबा दिल्यानंतर नाना पटोले म्हणाले की, वंचितने नितीन गडकरींना पराभूत करण्यासाठी पाठिंबा दिलाय. नाना पटोले आणि भाजप नेत्यांमध्ये असणारे संबंध यातून खुले झाले. ओपन झाले. नाना पटोले यांना काँग्रेसने भंडारा-गोंदियातून लोकसभा निवडणूक लढण्यास सांगितली. मात्र, त्यांनी मला लढता येणार नाही, असं सांगितलं. नाना पटोलेंनी लढण्यास कशामुळे नकार दिला. याचे खरे कारण आज आपणा सर्वांसमोर आले आहे.

# पुणेकर केदार जाधव देवेंद्र फडणवीसांच्या भेटीला, भाजपमध्ये प्रवेशाच्या चर्चा!

**पुणे । प्रतिनिधी**

भारताचा अष्टपैलू खेळाडू केदार जाधव यानं नुकतीच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. केदार जाधव याची ही भेट खासगी कामानिमित्त असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे, पण केदार जाधव लवकरच भाजपमध्ये प्रवेश करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. केदार जाधव यानं देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली, त्यावेळी आशिष शेलार, चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. केदार जाधव मूळचा पुणे येथील आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये तो पुणे संघाचं नेतृत्व करतो. केदार जाधव यानं पुण्यात देवेंद्र फडणवीस याची भेट घेतल्याचं समजतेय. केदार जाधव याच्यासोबत इतर भाजप नेतेही त्यावेळी उपस्थित होते. त्यावेळी केदार जाधव आणि देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये चर्चा झाली.



दरम्यान, याआधीही केदार जाधव आणि देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये भेट झाली होती. पण आता लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर केदार जाधव आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीमुळे राजकीय चर्चेला उधाण आले आहे. निवडणुकीच्या आधी भाजपमध्ये जोरदार इनकमिंग सुरु आहे. त्यातच आता केदार जाधव यानं देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. केदार जाधव याचा लवकरच भाजपात प्रवेश होणार असल्याच्या चर्चा सुरु झाल्या आहेत.

### केदार जाधव यांचे क्रिकेट करियर

केदार जाधव यानं भारतासाठी ७३ वनडे सामन्यात भारतीय संघाचं प्रतिनिधित्व केले आहे. केदार जाधव यानं ५२ डावात १३८९ धावा केल्या आहेत. केदार जाधव यानं वनडेमध्ये दोन शतकं आणि सहा अर्धशतके ठोकली आहे. केदार जाधव यानं २०१५ ते १७ या दरम्यान ९ आंतराष्ट्रीय टी २० सामने खेळले आहेत. यामधील सहा डावात १२२ धावा चोपल्या आहेत. त्याची सर्वोच्च धावसंख्या ५८ इतकी आहे. तर आयपीएलमध्ये केदार जाधव यानं ९५ सामने खेळले आहेत. त्यामधील ८१ डावात त्याने १२०८ धावा केल्या आहेत. त्याची सर्वोच्च धावसंख्या ६९ इतकी राहिली आहे. केदार जाधव याने आयपीएलमध्ये चार अर्धशतके ठोकली आहेत.

केदार जाधव याने ४२ वनडे सामन्यात गोलंदाजीही केली. त्यामध्ये त्याने २७ विकेट घेतल्या आहेत. २३ धावांच्या मोबदल्यात ३ विकेट ही त्याची सर्वोच्च कामगिरी आहे. आयपीएल आणि टी २० मध्ये केदार जाधव यानं गोलंदाजी केली नाही.

# धुळ्यात अजित पवार गटात अभूतपूर्व गोंधळ, प्रचंड राडा

धुळे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आधीच फूट पडलेली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचा वेगळा गट आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वेगळा गट पडलेला आहे. पण या फूट पडलेल्या गटांमध्ये देखील अंतर्गत धुसफूस असल्याचं चव्हाट्यावर येत आहे. अजित पवार यांच्या गटातली अंतर्गत गटबाजी आज उफाळून बाहेर आलेली बघायला मिळाली. विशेष म्हणजे मंत्री अनिल पाटील यांच्यासमोर ही गटबाजी चव्हाट्यावर आली. धुळ्यात आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची लोकसभा आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला स्वत: मंत्री अनिल पाटील उपस्थित होते. या बैठकीत अनिल पाटील यांच्यासमोरच



कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची बघायला मिळाली. कुठल्याही कार्यक्रमाबाबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या धुळे शहराध्यक्षांना माहिती दिली जात नसल्याची तक्रार यावेळी मंत्री अनिल पाटील यांच्याकडे कार्यकर्त्यांनी केली. धुळ्यात अजित पवार गटाच्या होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये धुळे शहराध्यक्षांनाच विश्वासात घेतलं जात नाही, अशी खंत कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी कार्यकर्त्यांनी प्रचंड गोंधळ घातला. या गोंधळानंतर आता मंत्री अनिल पाटील यांची प्रतिक्रिया समोर आली आहे.

''कार्यकर्त्यांच्या भावना प्रामुख्याने या होत्या की धुळे मतदारसंघात जे कुणी विद्यमान उमेदवार असतील आणि ते भविष्यात खासदार होतील. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाही विश्वासात घेतलं पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत महायुतीच्या प्रत्येक घटकाला त्यांनी विश्वासात घेतलं पाहिजे ही कार्यकर्त्यांची प्रमुख भावना होती. येणाऱ्या काळात आमच्या ज्या निवडणुका येतील त्यामध्ये जो कुणी निवडून येणारा खासदार असेल त्याने आमच्या पाठिशी उभं राहायला पाहिजे. त्या खासदाराने विधानसभा, जिल्हा परिषद, महापालिका निवडणुकांमध्ये मदत करायला हवी. आमच्या पक्षात आज जी चर्चा झाली त्यावेळी काही पदाधिकाऱ्यांना असा गैरसमज झाला की शहराची बैठक होती. आम्हाला बोलवलं गेलं नाही. पण शहराची बैठक ही वेगळी होणार आहे. ग्रामीणची बैठक आज पार पडली आहे'', अशी प्रतिक्रिया मंत्री अनिल पाटील यांनी दिली.

**'धुळे जिल्ह्यात कुठेही मतभेद नाहीत'**

''धुळे जिल्ह्यात कुठेही मतभेद नाहीत. काही मतभेद असल्यास तातडीने मिटवणार आणि महायुतीच्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी प्रयत्न करणार. नाशिकच्या जागेवरून मतभेद सुरू आहेत. पण मेरिटवर ही जागा दिली जाणार आहेत. नाशिकची जागा मिळावी यासाठी कार्यकर्त्यांनी मागणी केली आहे. पण दोन ते तीन दिवसात नाशिकच्या जागेच्या तिढा सुटणार आहे'', अशी माहिती अनिल पाटील यांनी दिली.

### 'देशात काँग्रेसच्या धुव्वा उडणार'

''संपूर्ण महाराष्ट्रासह देशात काँग्रेसच्या धुव्वा उडणार. तेव्हा राहुल गांधी ईव्हीएममध्ये घोटाळा झाल्याचा आरोप करतील. काँग्रेस रक्षताळाला पोहोचली आहे. आपलं अपयश लपवण्यासाठी राहुल गांधी असे वक्तव्य करत आहेत. आपलं संघटन कुठेतरी कमी पडत आहे. याकडे पाहण्याऐवजी राहुल गांधी एजन्सी आणि न्याय देणाऱ्या न्याय देवतेवर शंका उपस्थित करत आहेत'', असा दावा अनिल पाटील यांनी केला.

### अनिल पाटील यांचा आंबेडकरांना टोला

''वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना पाडण्याच्या विळा उचललाच पाहिजे. काँग्रेसचं सरकार असतानाची परिस्थिती आणि मोदी सरकार काळातील परिस्थिती प्रकाश आंबेडकर यांनी पाहिली आहे. त्यामुळे प्रकाश आंबेडकर यांनी त्यामुळे काँग्रेसचे उमेदवार पाडलेच पाहिजेत. काँग्रेस बरोबर जे जे पक्ष असतील त्यांच्यावरती त्यांच्या डोळा आहे, राग आहे. महाविकास आघाडीतील उमेदवारांना पाडण्याच्या विळा आंबेडकरांनी बरोबर उचला आहे'', असा टोला अनिल पाटील यांनी लगावला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# मतदान जनजागृतीसाठी भित्तीपत्रकाचे प्रदर्शन





**पुणे । प्रतिनिधी**

शिवाजीनगर विधानसभा मतदार संघाच्यावतीने राजा रविवर्मा कलादालनात निवडणूक साक्षरता क्लबमधील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी रंगविलेल्या मतदार जनजागृतीपर भित्तीपत्रक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी दादासाहेब गीते, अतिरिक्त सहायक मतदार नोंदणी अधिकारी रवी खंदारे, नायब तहसीलदार सायली धस, स्वीप प्रमुख प्रज्योती बिचुकले, स्वीप समितीचे दीपक कदम, सागर काशीद,राजेंद्र मोरे, पांडुरंग महाडिक उपस्थित होते.

भारतीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार तरुणांचा आणि भावी मतदारांचा निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याच्या आणि जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने निवडणूक साक्षरता क्लब शैक्षणिक संस्थांमध्ये स्थापन करण्यात आले आहेत. प्रदर्शनात २० शालेय व ६ महाविद्यालयीन क्लबमधील विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती या विषयावर रंगविलेले २५० भित्तीपत्रक लावण्यात आले होते. प्रदर्शनाला विद्यार्थी पालक व मतदारांनी भेट दिली.

ज्येष्ठ नागरिकांना मतदानाचे आवाहन

शिवाजीनगर विधानसभा मतदार संघात मागील लोकसभा निवडणुकीत कमी मतदान झालेल्या भागातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप पथकामार्फत ज्येष्ठ नागरिक, महिला बचत गट, अंगणवाडी पालक सभेत मतदान जागृती करण्यात येत असून त्याअंतर्गत औंधगाव येथील विरंगुळा केंद्रात ज्येष्ठ नागरिकांना मतदानाचे आवाहन करण्यात आले.

या मतदार संघातील जनवाडी येथील अंगणवाडी क्रमांक ५१ मधील पालक सभेत मतदान प्रक्रियेविषयी मार्गदर्शन करुन मतदानाची शपथ देण्यात आली.

# शिरूरच्या दूध उत्पादकांवर जनावरे विकण्याची वेळ

**मांडवगण फराटा । प्रतिनिधी**

दुधाला योग्य बाजारभाव मिळत नाही. शासनाचे अनुदानही अद्याप मिळालेले नाही. त्यात दुष्काळी परिस्थितीमुळे चारा आणि पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने शिरूरच्या पूर्व भागातील दूध उत्पादक शेतकरी दुहरी संकटात सापडले आहेत. त्यामुळे दुभती जनावरे विकण्याची वेळ या दूध उत्पादक शेतकर्यांवर आली आहे. शिरूरच्या पूर्व भागातील अनेक तरुण शेतीबरोबरच दूध उत्पादनाचा व्यवसाय करत आहेत. गेल्या वर्षापासून दुधाला चांगला दर मिळू लागल्याने या व्यवसायाकडे तरुण शेतकर्यांचा ओढा वाढला. या व्यवसायातून त्यांना चांगले आर्थिक उत्पन्न मिळू लागले होते. शेतमालापेक्षा दूधधंदा अधिक भरवशाचा वाटू लागल्याने काहींनी अत्याधुनिक गोठे बांधले.



अनेकांच्या गोठ्यात नव्याने गायी, म्हशी दिसू लागल्या. परंतु, काही दिवसांपासून दुधाच्या दरामध्ये घसरण झाल्यामुळे दूध उत्पादक शेतकरी चांगलाच हैराण झाला आहे. त्यातच जनावरांच्या खाद्याचे दरही कमालीचे वाढले आहेत. त्यामुळे दूध दराची खर्चासोबत सांगड घालणे अवघड होऊ लागले आहे. आता तर चार्याचा तुटवडा, पाण्याच्या टंचाईमुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत.

दूध व्यवसायासाठी गायी खरेदी करण्याकरिता अनेकांनी कर्ज घेतले. मात्र, आता घरखर्चही या दूध व्यवसायातून चालत नसेल, तर हा व्यवसाय बंद केलेलाच बरा, अशी प्रतिक्रिया दूध उत्पादक शेतकरी देऊ लागले आहेत. तसेच, अनेक शेतकर्यांचे दुधाचे अनुदान जमा झाले नसल्यामुळे शेतकरी संभ्रमात पडला आहे. नक्की अनुदान जमा तरी होणार कधी? असाही प्रश्न विचारला जात आहे.

# बोरी खुर्द येथे उसाच्या शेतात आढळले बिबट्याचे बछडे

**नारायणगाव । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील बोरी खुर्द येथील शेतकरी गोविंद सीताराम शेटे यांच्या उसाची तोडणी सुरु असताना बिबट्याचे तीन बछडे आज (दि.३१) आढळून आली. ही माहिती ओतूर विभागाचे वन क्षेत्रपाल वैभव काकडे यांनी दिली.



ते म्हणाले की, बोरी येथील गोविंद सीताराम शेटे यांच्या उसाची तोडणी मजूर करीत असताना आज सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास तीन बिबट्याची पिल्लं आढळून आली. उसाच्या सरीतच बिबट्याची पिल्ले आढळल्याने ऊस तोडणी मजूर घाबरून गेले व बाजूला पळाले. त्यांनी या बाबतची माहिती तात्काळ ऊस मालकांना कळविली.

वन विभागालाही माहिती दिल्यावर त्यांनी तत्काळ वनरक्षक घटनास्थळी पाठविला. दरम्यान, ऊस तोडणी थांबविण्यात आली असून बिबट्याची पिल्लं सुरक्षित ठिकाणी हालविण्यात आली आहेत. रात्री याच ठिकाणी उसाच्या शेतात ती पिल्लं ठेवण्यात येणार आहेत. त्यांची मादी त्यांना पुन्हा घेऊन जाऊ शकेल, असे वन क्षेत्रपाल वैभव काकडे यांनी सांगितले.

# लाच घेताना पुणे विद्यापीठातील अर्थशास्त्राच्या महिला प्राध्यापीका अँटी करप्शनच्या जाळ्यात

**पुणे । प्रतिनिधी**

पीएच.डी. डिग्रीसाठी तयार केलेले प्रबंध रिजेक्ट करण्यासाठी व सुधारणा करुन पुन्हा सादर करणे व त्यावर अप्रुव्हल देण्यासाठी २० हजार रुपये लाच स्वीकारताना पुणे विद्यापीठातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापीका डॉ. शकुंतला निवृत्ती माने (वय-५९) यांना पुणे एसीबीने रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. ए.सी.बी.ने ही कारवाई शनिवारी (दि, ३०) सांगवी येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख्याच्या कार्यालयात केली.

याबाबत ४० वर्षीय व्यक्तीने पुणे ए.सी.बी. कडे तक्रार केली आहे. तक्रारदार हे प्राध्यापक असून त्यांनी अर्थशास्त्र मध्ये पीएच.डी. डिग्री प्राप्त करुन घेण्यासाठी ऑनलाईन प्रबंध सावित्रीबाई फुले विद्यापीठ करीता तयार केला आहे. हा प्रबंध विद्यापीठाकडे सादर करण्यासाठी तक्रारदार यांचे मार्गदर्शक म्हणून प्राध्यापिका डॉ. शकुंतला माने यांची विद्यापीठाकडून नियुक्ती करण्यात आली आहे. तक्रारदार यांनी सादर केलेला प्रबंध रिजेक्ट करण्यासाठी व सुधारणा करुन पुन्हा सदार करणे व त्यावर अप्रुव्हल देण्यासाठी माने यांनी २५ हजार रुपये लाचेची मागणी केली. याबाबत तक्रारदार यांनी पुणे एसीबी कार्यालयात तक्रार दिली.





प्राप्त तक्रारीची २६ मार्च रोजी पडताळणी करण्यात आली. त्यावेळी शकुंतला माने यांनी तक्रारदार यांच्याकडे २५ हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार शनिवारी सापळा रचण्यात आला. तक्रारदार यांच्याकडे मागितलेल्या २५ हजार रुपयांपैकी २० हजार रुपयांचा पहिला हप्ता लाच म्हणून स्वीकारताना माने यांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांच्यावर सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे ए.सी.बी. पथकाने केली. पुढील तपास पोलीस उपअधीक्षक सुदाम पाचोरकर करीत आहेत.

# यंदा सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता : स्कायमेटचा अंदाज

**पुणे । प्रतिनिधी**

एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात भारतीय हवामान विभागाकडून यंदाच्या मान्सून बाबत घोषणा होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर स्कायमेट या खाजगी संस्थेने मानसून बाबत अंदाज व्यक्त केला आहे. यंदा सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडणार असल्याची शक्यता स्कायमेटने वर्तवली आहे.




सध्या अल निनो सक्रिय आहे. एप्रिल किंवा मे दरम्यान ही सक्रियता कमी होऊन तटस्थ (एन्सो) स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. ही स्थिती मान्सूनसाठी सकारात्मक असते. जून ते सप्टेंबर या कालावधीत ला निना सक्रिय असेल. याचा ऑगस्ट ते सप्टेंबर दरम्यान प्रभाव वाढेल. त्यामुळे यंदाचा पावसाळा सरासरीपेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे.

इंडियन ओशन डाय पोल ही यंदा सकारात्मक असण्याची शक्यता आहे. याचाही मान्सूनला फायदा होऊ शकेल. यंदा मान्सून सरासरीच्या ९६ ते १०४ टक्के पडण्याची शक्यता आहे.

# पॉर्न फिल्म बनविणाऱ्यांचा पर्दाफाश !

## ५ महिलांसह १८ जण ताब्यात

**पिंपरी । प्रतिनिधी**

लोणावळा शहराच्या जवळच मळवली रेल्वे स्टेशन पासून काही अंतरावर असलेल्या पाटण गावाच्या हद्दीमध्ये एका खाजगी बंगल्यात पॉर्न फिल्म बनवण्याचा उद्योग करणाऱ्या टोळीचा लोणावळा ग्रामीण पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून फिल्म अर्थात चित्रफीत बनवण्यासाठी लागणाऱ्या सहा लाख ७२ हजार ६२० रुपये किमतीच्या मुद्देमालासह १८ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार दिनांक २९ मार्च रोजी पाटण गावाच्या हद्दीमध्ये असलेल्या आर्णव व्हिला (ता. मावळ, जि. पुणे) या एका खाजगी बंगल्यात अश्लिल, नग्न, बिभीस्त व्हिडीयो तयार करण्याचा उद्योग सुरू असल्याची गोपनीय खबर लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किशोर धुमाळ यांना मिळाली.

या माहितीच्या आधारे छापा टाकण्यात आला. या छाप्यात पोलिसांना सदरच्या बंगल्यात संभोगाच्या बीभत्स चित्रफीत तयार करीत असलेली मंडळी रंगेहाथ मिळून आली. पोलिसांनी घटनास्थळावरून ५ महिला आणि १० पुरुषांसह हा बंगला बेकायदेशीरपणे भाड्याने देणाऱ्या आणि तो चालवणारे ३ जण अशा एकूण १८ जणांना ताब्यात घेऊन चित्रफीत तयार करण्यासाठी वापरलेले दोन कॅमेरे, वेगवेगळ्या लाईट, वायरलेस माईक, लॅपटॉप आदी मुद्देमाल जप्त केला आहे.

उप.नि. भारत भोसले यांनी याप्रकरणी सरकारी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, विष्णु मुन्नासाहब साओ (३०, रा.परगना, कोलकत्ता), जावेद हबीबुल्ला खान (३५, रा.बस्ती, उत्तरप्रदेश), अलका राज के राजन (२३, रा.रंगपुरी, साउथ वेस्ट दिल्ली), नेहा सोमपाल वर्मा (३८, रा.मुजफानगर, उत्तरप्रदेश), रिया वासु गुप्ता (२१, रा.दिल्ली), बुध्दसेन बरदानीलाल श्रीवास (२९, रा. चंद्रपुर), समीर मेहताब आलम (२६, रा. अमरोहा, उत्तरप्रदेश), अनुप मिथीलेश चौबे (२९, रा. कांदिवली ईस्ट, मुंबई), रामकुमार श्रीभगवान यादव (२१, रा. रोनक सिटी, हरियाणा), विना भारत पोवळे (वय ३२, रा. खोपट, ठाणे), मैनाज जाहीद हुसेन खान (२८, रा.नालासोपारा वेस्ट, पालघर), राहुल सुरेश नेवरेकर (३८, रा. वागळे इस्टेट, ठाणे), अनिकेत पवन शर्मा (१९, सुरत, गुजरात), वंशज सचीन वर्मा (२१, रा.डेहराडुन) आणि मनीष हिरामण चौधरी (२०, रा.शास्त्रीनगर, हरीयाणा) यांना प्रथम ताब्यात घेऊन त्यातील १३ पुरुष आरोपींना अटक करण्यात आली आहे. या सर्वांच्या विरोधात अश्लिल, नग्न व बिभीस्त चित्रीकरण करून त्या चित्रफिती अवैध वेबसाईट्स व मोबाईल अप्लीकेशनवर अपलोड करून प्रसारीत व प्रचारीत करण्याची व्यवस्था केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# प्रॉपर्टीच्या वादातून महिलेची आत्महत्या, वाघोली येथील घटना

**पुणे । प्रतिनिधी**

प्रॉपर्टीच्या वादातून शारीरिक व मानसिक त्रास दिल्याने ५६ वर्षीय महिलेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार २८ मार्च रात्री साडे अकरा ते २९ मार्च सकाळी नऊ या कालावधीत वाघोली येथील लेन नंबर ११, बी.आय.व्ही.वाय इस्टेट येथील ट्विन बंगलो येथे घडला आहे. याप्रकरणी चार जणावर गुन्हा दाखल केला आहे.

कुंदा अदिनाथ ढुस (वय-५६) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत अनुपमा चेतन सुक्रे (वय-३३ रा. सुतारवाडी, पाषाण) यांनी शनिवारी (दि.३०) लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरुन संजय ठाणगे (वय-५०), अनिता ठाणगे (वय-४५), ऋषीकेश ठाणगे (वय-२८ सर्व रा. रा. साईनाथनगर, वडगाव शेरी), मंदा रमेश कुऱ्हे यांच्यावर भा.दं.वि. कलम ३०६, ५०४ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या आईच्या नावावर साईनाथ नगर येथे प्रॉपर्टी आहे. फिर्यादी यांची आई व आरोपींमध्ये यावरुन वाद सुरु आहे. या प्रॉर्टीच्या वादातून आरोपींनी फिर्यादी यांच्या आईला शारीरिक व मानसिक त्रास दिला. आरोपींच्या सततच्या त्रासाला कंटाळून फिर्यादी यांच्या आईने त्यांच्या मोठ्या बहिणीच्या राहत्या घरातील हॉलमध्ये छताच्या पंख्याला स्कार्फच्या सहाय्यने गळफास घेऊन आत्महत्या केली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी चार जणांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

# पवना नदीच्या पात्रात राडारोडा टाकणाऱ्या एका महिलेसह चौघांविरोधात वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातून वाहणाऱ्या पवना नदीच्या पात्रात राडारोडा टाकणाऱ्या एका महिलेसह चौघांविरोधात वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राडारोडा टाकून नदी प्रदूषित केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

संभाजी निवृत्ती नढे (वय ६४), तुकाराम दामोदर नढे (वय ५५), गणेश ज्ञानेश्वर नढे (वय ३५, सर्व रा. काळेवाडी) आणि एका महिलेविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी महापालिकेचे आरोग्य निरीक्षक अमोल गणपत गोरखे (वय ४७, रा. आकुर्डी) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.




आरोपींनी गट नंबर ९६ रहाटणी, काळेवाडी येथील पवना नदीपात्रामध्ये बांधकामाचा राडारोडा टाकला. यामुळे नदी प्रदूषित झाली आहे. रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर केला आहे. त्यामुळे आरोपींवर पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम ३, १५ नुसार गुन्हा दाखल केल्याचे पोलिसांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीपात्रामध्ये राडारोडा आणि मातीचा भराव टाकण्याचे प्रकार समोर आले आहेत. त्यामुळे नदी पात्र अरुंद होत आहे. राडारोडा टाकणाऱ्यांवर महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाने धडक कारवाईला सुरुवात केली आहे. राडारोडा टाकणाऱ्यांकडून एक लाख १५ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. आता गुन्हे दाखल करण्यास सुरुवात केली आहे.

# बंद शौचालयामुळे महिलांची कुचंबणा; शौचालयासह नागरी सुविधा द्या- महिलांची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

इंदिरानगर गुलटेकडी वसाहतीमधील खड्डा परिसरात सार्वजनिक शौचालय अनेक महिन्यांपासून बंद आहे. परिसरात शौचालय नसल्याने तसेच सध्या रमजान महिना सुरू असल्याने शौचालय तत्काळ सुरू करावे, अशी मागणी स्थानिक महिलांनी केली आहे. ड्रेनेज खराब असल्याने सदरचे शौचालय बंद असून, या भागात तात्पुरती सोय म्हणून मोबाईल शौचालय देण्यात येईल, अशी माहिती महापालिकेचे सहायक आयुक्त प्रदीप आव्हाड यांनी दिली. नागरी सुविधांपासून वंचित असलेला प्रभाग २८ मधील परिसर म्हणजे इंदिरानगर गुलटेकडी वसाहत आहे.



मागील चार टर्मपासून या भागात अनेक नागरी सुविधा नाहीत. सध्या रमजान महिना सुरू आहे. मुस्लिम बांधवांचे उपवास सुरू आहेत. जवळपासच्या परिसरात दुसरे सार्वजनिक शौचालय नाही. त्यामुळे बंद असलेले शौचालय तत्काळ सुरू करावे, अशी मागणी स्थानिक महिलांनी केली आहे. बंद शौचालयासमोर उभे राहून महिलांनी 'तत्काळ शौचालय सुरू करा; अन्यथा आंदोलन करू' असा इशारा दिल्याची माहिती सुरैया शेख व महिलांनी दिली.

सदरचे शौचालय ड्रेनेजचे कारण पुढे करून अनेक महिन्यांपासून बंद ठेवण्यात आले आहे. रस्ते, पाणी या समस्या कायमस्वरूपी आहेतच, त्यातच शौचालय बंदची नवी समस्या पुढे आली आहे. या भागात मोठ्या प्रमाणात मुस्लिम बांधव राहतात. किमान धार्मिक उपवास असल्याने तरी महापालिका प्रशासनाने तात्पुरती सोय करावी, अशी मागणी सलीम सय्यद यांनी अधिकार्यांकडे केली आहे.

या वेळी माधवी नाईक, सुरैया शेख, लता ओव्हाळ, सुमन जाधव व महिला उपस्थित होत्या. या वेळी महिलांनी प्रशासनासह स्थानिक नाकर्त्या लोकप्रतिनिधींचा निषेध व्यक्त केला आहे. लोकप्रतिनिधी व त्यांचे कार्यकर्ते निवडणुका आल्या की वस्तीत येतात, एरवी समस्या असल्या की कोणीही येत नाही. समस्यांचे फोटो पाठवा; मग बघतो, असे लोकप्रतिनिधी सांगतात, असे सांगून त्यांनी तीव्र निषेध व्यक्त केला.

# सेवा विकास बँक गैरव्यवहार प्रकरण : रोझरीचा संचालक विनय अर्हानाला बेड्या

**पुणे । प्रतिनिधी**

सेवा विकास बँकेतील कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणात रोझरी एज्युकेशन ग्रुपचा संचालक विनय अर्हाना व ॲड. सागर सूर्यवंशी यांना गुन्हे अन्वेषण विभागाने (सीआयडी) गुरुवारी अटक केली. गैरव्यवहार प्रकरणात दोघांचा सहभाग दिसून आल्याने ही कारवाई करण्यात आली. दोन्ही आरोपींना रात्री उशिरा विशेष न्यायालयापुढे हजर करण्यात आले. विशेष न्यायाधीश सुनील वेदपाठक यांनी रात्री साडेबाराच्या सुमारास सुनावणी घेऊन दोन्ही आरोपींना ४ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

विनय अर्हाना यास ईडीने ४२९ कोटी रुपयांच्या मनी लॉड्रिंग प्रकरणात अटक केली होती.

याबाबतचा सखोल तपास ईडीकडून करण्यात येत आहे. एका आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी सीआयडीकडून करण्यात येत आहे. आरोपी अर्हानाविरोधात वेगवेगळे फसवणुकीचे गुन्हे दाखल असून, याबाबत अर्हानाने मुंबई उच्च न्यायालयात दाद मागत एफआयआर रद्द करण्याची मागणी केली होती. त्यानुसार उच्च न्यायालयाने अर्हानाला दिलासा देत एफआयआर रद्द ठरविला. परंतु, याबाबत सर्वोच्च न्यायालयात दाद मागितल्यावर सुनावणी होऊन सीआयडीला



तपास करण्यास संमती दिली. त्यानुसार सीआयडीने याबाबत चौकशी सुरू करून विनय अर्हाना व सागर सूर्यवंशी यांना अटक केली आहे. सेवा विकास सहकारी बँकेचे मुख्यालय पिंपरी येथे होते. एकूण २५ शाखांत एक लाख ग्राहक होते. २०१९ व २०२० मध्ये बँकेच्या ग्राहकांनी आरबीआयकडे सेवा विकास सहकारी बँकेविरोधात गैरप्रकाराच्या तक्रारी केल्या. त्यानुसार जून २०२१ मध्ये आरबीआयने याबाबत गंभीर दखल घेतल्यावर सेवा विकास बँकेच्या काही संचालकांना अटक देखील करण्यात आली व बँकेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. लेखापरीक्षकामार्फत याबाबतचा एक अहवाल देखील आरबीआयला सादर करण्यात आला. त्याआधारे पिंपरी-चिंचवड पोलिसांनी या घोटाळ्यावर आधारित विशेष तपास यंत्रणा (एसआयटी) नेमली. त्याच्या चौकशीत एकूण ४२९ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे निष्पन्न झाले. ईडीने या प्रकरणात जानेवारी २०२३ मध्ये बँकेचे पूर्वीचे अध्यक्ष अमर मूलचंदानी व अन्य आरोपींशी संबंधित चौकशी केली. विनय अर्हाना हा आजारी असल्याने येरवडा कारागृहातून ससून रुग्णालयात दाखल असताना त्याने ड्रगमाफिया ललित पाटील यास पळून जाण्यास देखील मदत केल्याची बाब समोर आली.